श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.,अ.नगर
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पीटल जवळ, बुरूडगांव रोड, अ.नगर फोन : (०२४१) ३५८६६५९
शाखा : बंधन बँकेशेजारी, नेप्ती रोड, केडगांव (देवी), अ.नगर. मो. ७४९९२३५९७१
ठेवीचे व्याजदर
४६ ते ९० दिवस ८%
९१ ते ३६५ दिवस ९%
१ वर्ष व त्यापुढे १०%
शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ८४ महिने
धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ५ महिने मुदत
अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज
कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु.... १८ व्या वर्षी प्राप्त
दैनिक बचत (डेली कलेक्शन) / रिकरिंग (आर.डी.)/मुदत ठेव (एफ.डी.) साठी कमिशन एजंट नेमणे आहेत.
संस्थापक - श्री. अनिल मोहिते । अध्यक्ष - श्री. अजय मोहिते



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार, अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०३.०२.२०२५ | अंक नं. २८२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# बेशिस्त वाहनचालकांमुळे शहरातील बाजारपेठेत होतेयं 'वाहतुकीची कोंडी'

## खरेदीसाठी येणारे नागरिक तसेच व्यापारी झालेत त्रस्त, उपाययोजना करण्याची मागणी





(छाया - धनेश कटारिया)



नगर - नगर शहरातील बाजारपेठेत अगोदरच अतिक्रमणांची समस्या गंभीर असताना या सम्यसेमध्ये बेशिस्त पार्किंगची सुद्धा भर पडत असून सातत्याने बाजारपेठेतील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. यासर्व प्रकाराने बाजारपेठेत खरेदीसाठी येणारे नागरिक तसेच व्यापारीही हैराण झाले आहेत.

नगरच्या बाजारपेठेमध्ये खरेदी करण्यासाठी जिल्ह्याच्या ग्रामीण भागासह मराठवाड्यातून ग्राहक येतो. बाजारपेठेत वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना करणे गरजेचे असताना त्याकडे नेहमीच दुर्लक्ष करण्यात येत आहे.त्यामुळे बाजारपेठेतील प्रमुख रस्त्यावर करण्यात येणारी अस्ताव्यस्त पार्किंग व वाढू लागलेले अतिक्रमण यामुळे सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

अनेक वाहनचालक माल वाहतूक करणारी वाहने रस्त्याच्या मधोमध बेशिस्तपणे उभे करून तासून तास गायब होतात. यामुळे मुख्य बाजारपेठ असलेल्या डाळ मंडई येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. त्याचा त्रास नगरकरांना सहन करावा लागतो. तसेच कापड बाजार, नवी पेठ, चितळे रोड या विविध भागांमध्ये ही वाहतूक कोंडी कायमची डोकेदुखी झाली आहे. याकडे पोलीस प्रशासन, शहर वाहतूक शाखा यांच्या कडून डोळे झाक केली जात आहे.

### रस्त्याच्या दोन्ही बाजूने पार्किंग

माणिक चौक, भिंगारवाला चौक, कापड बाजार, चितळे रोड, नवी पेठ, चौपाटी कारंजा अशा बहुतांश भागामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूने दुचाकीची पार्किंग करण्यात येते. यामध्ये अनेक वाहनचालक बेशिस्त पद्धतीने वाहनाची पार्किंग करीत रस्त्यावर अडथळा निर्माण करीत आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूने छोट्या विक्रेत्यांकडून अतिक्रमण करण्यात येत असल्यामुळे आधीच अरुंद झालेल्या बाजारपेठेतील रस्त्यांवर बेशिस्त पार्किंगमुळे वाहनांना जाण्यासाठी कमी जागा राहत आहे. त्यामुळे एखादे चारचाकी वाहन बाजार आल्यानंतर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या भागातील बहुतांश दुकानदार आपल्या दुकानाची जाहिरात असणारा फलक रस्त्यावर ठेवतात. या फलकांचासुद्धा वाहतुकीचा अडथळा निर्माण होत आहे.या वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीतून नगरकरांची सुटका करण्यासाठी महापालिका, पोलिस प्रशासन आणि शहर वाहतूक शाखा यांनी संयुक्तपणे उपाययोजना करण्याची गरज आहे.


१३०० स्क्वे.फू. गाळा भाड्याने देणे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना, क्लाससाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

नावीन्याची नवलाई...
अक्षता सारीज्
20% DISCOUNT
मर्यादित स्टॉक उपलब्ध
त्वरा करा,
अशी संधी पुन्हा नाही !
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
घागरा । सिल्क । शालू । ६वार
नवीपेठ, अहिल्यानगर, फोन : ०२४१-२३४६४१५


# जातीयवादी वक्तव्य करणाऱ्या नामदेव शास्त्रींवर कारवाई करा

## अहिल्यानगरमधील अखंड मराठा समाजाची जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे मागणी



जातीयवादी वक्तव्य करणाऱ्या नामदेव शास्त्रींवर कारवाई करावी या मागणीचे निवेदन पोलिस प्रशासनाला देताना नगर मधील अखंड मराठा समाजाचे शिष्टमंडळ.

नगर - भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी केलेल्या जातीयवादी वक्तव्याने सकल मराठा समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजात जातीयवाद वाढविणाऱ्या अशा वाचाळवीरांवर कारवाई करावी, अशी मागणी नगरमधील अखंड मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने पोलिस अधिक्षकांकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भगवानगडाचे वाचाळवीर महंत नामदेव शास्त्री यांनी केलेले वक्तव्य अत्यंत बेअक्कल व जातीयदवादी असून, त्यांनी केलेल्या वक्तव्याने सकल मराठा समाजाच्या भावनांना ठेच पोहोचून भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या बोलण्यामुळे जातीयवाद वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

त्यामुळे महंत नामदेव शास्त्री यांनी व्यक्त केलेले आपले वक्तव्य मागे घ्यावे. जर त्यांनी त्यांचे वक्तव्य मागे घेतले नाही तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. आमच्या तीव्र भावना सरकारपर्यंत पोहचवून महंत नामदेव शास्त्री यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी गोरख दळवी, मिलिंद घोंगाणे, वैभव भोगडे, रवि बारस्कर, जगन्नाथ निमसे, शशिकांत भांबरे, प्रशांत काळे, गोरक्षनाथ पटारे, अक्षय भगत, नवनाथ मोरे, गणेश वागस्कर, कैलास वागस्कर, आजिनाथ मोकाटे, रवि भोर, अशोक देवढे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे आदी उपस्थित होते.



स्टेशन रस्त्यावर उड्डाणपुलाखाली रविवारी रात्री आठच्या सुमारास ड्रेनेज लाईनचे काम चालू असताना पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले. (छाया - समीर मन्यार)


शिखर संस्थेवर स्थान राष्ट्रीय स्तरावरील बहुमान तुमच्या निवडीचा आम्हां अभिमान...
वसंत पंचमीच्या शुभदिनी सृष्टी नवचैतन्याने बहरणं प्रारंभ करते.
या शुभदिनी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष
मा.श्री. वसंतजी लोढा
यांची जैनीयांच्या देशपातळीवरील सर्वोच्च, शिखर अशा श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली या संस्थेच्या राष्ट्रीय मंत्रीपदी निवड झाली. आपल्या कार्यकर्तृत्वाचा आम्हाला अभिमान आहे.
उत्तरोत्तर कार्यकर्तृत्वासाठी शुभेच्छा...!
हार्दिक अभिनंदन
मिलींद गंधे - जेष्ठ संचालक | विकास पाथरकर - मानद सचिव | सुधीर पगारिया - उपाध्यक्ष
निलेश लोढा । शैलेश चंदे । श्रीमती शैला चंगेडे
सौ. शारदा हौसिंग । बाबासाहेब साठे । सुभाष फणसे
आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त शहरातील एक विश्वसनीय पतसंस्था
पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर
मुख्य कार्यालय : आनंदी बाजार, पटवर्धन चौक, अ.नगर. फोन : २३४५४४६
• सावेडी : फोन : २४२४७९७
Dishan

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

GSK D'SCALE ELECTROMAGNETIC WATER CONDITIONER
खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय..
इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
खाऱ्या पाण्याला बनवा 100% वापरण्यायोग्य...
संपूर्ण अपार्टमेंट, हॉटेल, हॉस्पिटल, नर्सरी इत्यादी ठिकाणी एकाच मशिनने काम होते.
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## दावोसची फलनिष्पत्ती

नुकत्याच दावोलस, स्वित्झर्लंड या शहरात झालेल्या इकॉनॉमिक फोरमच्या परिषदेत महाराष्ट्राने लक्षणीय कामगिरी केली.

दरवर्षी आयोजित या दावोस परिषदेत विविध देशांतील नेते, अर्थ-वाणिज्य मंत्री, उद्योजक, व्यावसायिक आवर्जून उपस्थित राहून आपापल्या देशात गुंतवणूक, उद्योगधंदे इ. आणण्यास विशेष प्रयत्न करतात.

गेल्या १० वर्षामध्ये विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी देशा-देशात, राज्या-राज्यांमध्ये स्पर्धात्मकता दिसते. कार्यशील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची ही चौथी दावोस भेट असून, त्यांचा हा दौरा आणि या दौऱ्यात झालेली सुमारे ०५ लाख कोटीचे (Mou) विविध करार महाराष्ट्र देशात सर्वाधिक अग्रेसर व




विकसित आहे हे दर्शविते.



केंद्र सरकारने ५ ट्रिलीयन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचा घेतलेला ध्यास महाराष्ट्राच्या १ ट्रिलीयनच्या उद्दिष्टांकडे जाण्यास ही दावोस परिषद फलदायी ठरेल. खरं तर अशा प्रकारचे उपक्रम विविध जिल्ह्यांत घेऊन उद्योग, औद्योगिक वाढीसह रोजगार निर्मितीला मोठी सुवर्णसंधी आहे. अर्थात संकुचित विचार-पक्षभेद आणि स्वार्थरहित प्रोत्साहन, सहकार्य महत्त्वाचे ठरेल. यादृष्टीने महाराष्ट्र देशाला दिशादर्शक ठरेल असे एक विकसित मॉडेल, ध्येयधोरण ठरवून केवळ देशातच नाही तर जगात एक उद्योगप्रेमी विकसित राज्य होईल. त्यासाठी शुभकामना करू या.

# शिर्डीत साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची चाकूने भोसकून हत्या

## आणखी एका तरूणावर जीवघेणा हल्ला, दोघे हल्लेखोर सीसीटीव्हीत कैद; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

शिर्डी - शिर्डीच्या साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची चाकूने भोसकून निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. सोमवारी ३ फेब्रुवारीला पहाटे दोन वेगवेगळ्या ठिकाणी या घटना घडल्या. या घटनेत अन्य एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या हत्याकांडामुळे शिर्डी चांगलीच हादरली असून मोटारसायकल वर आलेले दोघे हल्लेखोर सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत.





मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष साहेबराव घोडे (वय ४५) व नितीन कृष्णा शेजुळ (वय ३२) अशी मृत कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर कृष्णा देहरकर असे गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. कृष्णावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहत.

या घटनेतील मयत झालेले सुभाष घोडे हे मंदिरातील कर्मचारी ड्युटीवर येत होते, तर नितीन शेजुळ हे सुरक्षा कर्मचारी ड्युटी संपवून घरी निघाले होते. कृष्णा देहरकर हे मुलाला सोडून घरी निघाले होते. त्यांच्यावरही प्राणघातक हल्ला झाला. पहाटे चार ते साडेपाच दरम्यान विमानतळ रोडला विविध ठिकाणी या घटना घडल्या.

मोटार सायकलवर असलेल्या दोघांनी चोरीच्या उद्देशाने या तिघांना अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली. इतक्यावरच न थांबता विकृत मनोवृत्तीतून आरोपींनी या तिघांवर चाकूने असंख्य वार केले. यात दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. सीसीटीव्हीमध्ये ही घटना कैद झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोलिसांना त्याची माहिती कळवली. पण पोलिसांनी तासभर विलंबाने घटनास्थळ गाठल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. इथे कुणीही कुणासाठी लगबगीने येत नाही, असा आरोप मृत तरुणाच्या कुटुंबीयांनी केला. या हत्येला अपघाताचे स्वरुप देण्यात येत असल्याचा आरोपही या प्रकरणी केला जात आहे.

मृत सुभाष घोडे हे शिर्डीच्या करडोबा नगर चौकात राहत होते. त्यांच्यावर घरापासून काही अंतरावरच हल्ला करण्यात आला. तर नितीन शेजुळ व कृष्णा देहरकर यांच्यावर श्रीकृष्ण नगर भागात हल्ला झाला. पोलिसांनी अपघात असल्याचे सांगून घटना गांभीर्याने न घेतल्याने मृतांचे नातेवाईक व नागरिकांनी संताप व्यक्त केला. घोडे यांच्या नातेवाईकांनी आरोपींना जोवर अटक होत नाही तोवर मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका घेतली आहे. या घटनांमुळे शिर्डीत तणावपूर्ण शांतता आहे.

## खुनाऐवजी अपघाताची पोलिसाने केली नोंद

### डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडून निलंबनाची मागणी

दरम्यान, सकाळी घटनास्थळी आलेल्या माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी घटना असल्याचे सांगितले. याबाबत साडेपाच वाजता कॉन्स्टेबलला कळवल्यानंतर त्यांनी बॉडी रुग्णालयात आणून अपघाताची नोंद केली. ज्या पोलिसाला अपघात व खून यातील फरक कळत नाही, त्याला पोलिस खात्यात राहण्याचा अधिकार नाही. त्याच्या निलंबनासाठी पोलीस अधीक्षकांशी बोललो आहे, पोलीस निरीक्षक यांच्यावरही कारवाई करण्यात येईल. शिर्डीची गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येतील. येथील पोलीस व्हीआयपी दर्शन प्रोटोकॉलमध्ये व्यस्त असतात. त्यामुळे प्रोटोकॉलसाठी स्वतंत्र पोलीस देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे आग्रह धरून अनेक दिवसांचा हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात येईल, असे त्यांनी म्हटले.

## मोपेडची चोरी

नगर - नगर मनमाड रोडवरील सावेडीनाका येथील सुझुकी टू व्हीलर शोरूम समोर रस्त्याच्या कडेला लावलेली नवी एक्सेस १२५ मोपेड कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी शोरूमचे विक्री व्यवस्थापक आशीष सदानंद अल्हाट (वय ४५, रा. पोखर्डी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.

## दुकानातून चोरी

नगर - दुकानाचा पत्रा उचकटून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून दुकानातील ४० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून गेली. ही घटना नगर मनमाड रोडवरील पद्मावती चौक सावेडी येथे घडली. या प्रकरणी सुशील सुनील कुकरेजा (वय २१, रा. नवलानी ग्राउंडजवळ, तारकपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहे.

## मृत अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन

नगर - औषधोपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या ५० वर्षीय अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याची ओळख न पटल्यामुळे पोलिसांनी त्याची ओळख पटवण्याचे नागरिकांना आवाहन केले आहे,

तोफखाना पोलिस मृताची ओळख पटवण्याची तसेच त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. मृत व्यक्तींचे वर्णन असे आहे. वयअंदाजे ५० वर्ष, नाव (रामूकुमार) पुर्ण नाव पत्ता माहित नाही), शरीर बांधा सडपातळ, वर्ण सावळा, उंची पाच फूट चार इंच, चेहरा उभट, नाक सरळ, डोक्यावरील केस मोठे पांढरे. असे आहे.

या व्यक्तीस कोणी ओळखत असेल, अगर त्याच्या नातेवाईकांची काही माहिती असेल तर त्यांनी तोफखाना पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा. असे आवाहन पोलिस नाईक वाय. जी. चव्हाण यांनी केले आहे.



## उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना दिले रक्तानी रेखाटलेले चित्र

अहिल्यानगरचे नगरसेवक शाम नळकांडे यांच्यावतीने चित्रकार गणेश जिंदम यांनी रक्तानी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांचे रेखाटलेले चित्र उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना देण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, संपर्क प्रमुख दिलीप सातपुते, शहरप्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, बाबु टायरवाले, संजय शेंडगे, गणेश कवडे, सचिन शिंदे, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, परेश लोखंडे, संतोष गेन्नप्पा, संदिप दातरंगे आदि उपस्थित होते.



राहुरी येथील मुळा सुतगिरणी च्या मैदानावर आयोजित राष्ट्रीय महासत्संग सोहळ्यात अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वरचे अध्यक्ष गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांना ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स इंग्लंड च्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स इंग्लंड चे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या राहुरी सेवाकेंद्राच्या च्या संचालिका बी के नंदा दीदी, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या सोनई सेवाकेंद्राच्या च्या संचालिका बी के उषा दीदी व अक्षय कार्डिले आदी.

## श्रीमती शांताबाई गांधी यांचे निधन

नगर - मोहिनीनगर केडगाव येथील रहिवासी श्रीमती शांताबाई माणकचंद गांधी (वय ८६, शहरटाकळीवाला) यांचे ३ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.विलास, संतोष, पारस गांधी, मैनाबाई लुणिया यांच्या त्या मातोश्री तर मदनलाल गांधी यांच्या चुलती होत. त्यांनी मरणोत्तर विळद येथील विखे पाटील हॉस्पिटल येथे देहदान केले.



## मदनलाल फिरोदिया यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील राजकीर्ती बंगला, तीर्थंकर कॉलनी, बुरुडगाव रोड येथील रहिवासी मदनलाल मोहनलाल फिरोदिया (वय ९१) यांचे २ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. रसिकलाल, नंदलाल, दिलीप फिरोदिया यांचे ते बंधू होत. स्व. अशोक, सुरेश, प्रकाश फिरोदिया व सौ.शिला अरुण बोरा यांचे वडील होत. त्यांच्या मागे २ भाऊ, भावजया, १ मुलगी असा परिवार आहे.



## श्रीमती बदामबाई कटारिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर - नंदनवन कॉलनी, बुरुडगाव रोड येथील रहिवासी श्रीमती बदामबाई असराज कटारिया (खरवंडीवाला, वय ९४) यांचे १ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्रावक संघाचे संचालक रतीलाल, झवरलाल कटारिया यांच्या त्या मातोश्री होत.



## डॉ. शैलजा ठाकूर यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - येथील तोफखाना भागातील रहिवासी डॉ. शैलजा शंकरराव ठाकूर (वय ६८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी वद्यैकीय अधिकारी म्हणनू राज्यात अनके ठिकाणी काम के ले हाते. त्या नुक त्याच सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्या अविवाहित होत्या. त्यांच्यामागे विवाहित भाऊ आणि ६ बहिणी असा परिवार आहे. पुण्याचे सुनील डांगे यांच्या त्या मेव्हणी होत.



## संदिप साबद्रा यांचे ह्दयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील संदिप सुरेशचंद्र साबद्रा (वय ५२) यांचे २ फेब्रुवारी रोजी ह्दयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, चुलते, पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, तीन बहिणी असा परिवार आहे. स्टेट बँक चौकातील महावीर प्लास्टिकचे मालक अशोकलाल विठ्ठलदास साबद्रा यांचे पुतणे, पोलीस स्टेशन शेजारील विशाल ट्रेडिंगचे मालक विशाल साबद्रा यांचे थोरले बंधू होत.



# अवैध धंदे बंद करण्याच्या मागणीसाठी पाच दिवसापासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर महिलांचे उपोषण सुरु

### सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या बदलीची मागणी

नगर - पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे बंद करावे, सदर हद्दीतील गुन्हेगारी रोखण्यास व अवैध धंदे बंद करण्यास अकार्यक्षम ठरल्याचा आरोप करत सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या बदलीसाठी महिलांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया समोर उपोषण सुरु करण्यात आलेले आहे. उपोषणाचा शनिवारी (१ फेब्रुवारी) पाचवा दिवस होता.

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गांजा, हातभट्टी, मटका, जुगार, बिंगोसह गुन्हेगारी जोमाने सुरू आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक झोपेचे सोंग घेत असून, या भागात अवैध धंद्याबरोबरच गुन्हेगारी देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दरोडा, लूटमार, चोऱ्या यांसारखे गंभीर गुन्हे सातत्याने घडत आहे. एम आयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या पांढरीपुल हॉटेलच्या मागे सर्व प्रकारचा गुटखा खुलेआम विक्री सुरू होती. सदर गुटख्याच्या धंद्यावर नाशिक येथील डीआयजी यांच्या पथकाने कारवाई केली असता, त्या ठिकाणी सुमारे १ कोटी रुपयांचा गुटखा ताब्यात घेण्यात आला. तरी देखील पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक झोपेचे सोंग घेत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.



पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे बंद करण्याच्या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसलेल्या महिला.

सध्या परिस्थितीमध्ये सर्वात जास्त गांजाची विक्री एमआयडीसी हद्दीत होताना दिसून येत आहे. अनेक युवक गांजाच्या नशेला बळी पडत असून, नशेमध्ये बेभान होऊन त्यांच्याकडून अनेक गंभीर गुन्हे घडत आहे. यामध्ये अनेक अल्पवयीन मुले असून, त्यांचे भवितव्य उध्वस्त होत आहे. हातभट्टी पिऊन अनेक युवक मृत्युमुखी पडले आहेत. व्यसनाच्या आहारी गेलेल्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. सोरट, बिंगो, जुगार, मटका या अवैध धंद्यावर रोजंदारीवर कमवलेले पैसे युवक गमावत आहे. त्यामुळे अनेक कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असून, काही कुटुंबीय कर्जबाजारी झाले असल्याचे म्हंटले आहे.

या अवैध धंद्यावर पोलीस प्रशासनाकडे मागणी करून देखील कारवाई केली जात नाही. अवैध धंदेवाले देखील बिनधास्तपणे पोलिसांना हप्ते चालू असल्याचे उघडपणे बोलत आहे. एक प्रकारे अवैध धंद्यांना पाठबळ देण्याचे काम होत असल्याचा आरोप रिपाई महिला आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे. या उपोषणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्षा ज्योती पवार, शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, कावेरी भिंगारदिवे, ज्योती साठे, जयश्री गायकवाड, शितल नाटेकर, सारिका गांगुर्डे, सविता भालेराव, सारिका साळवे, संपदा म्हस्के, दानिश शेख, नईम शेख, संदीप वाघचौरे, विजय शिरसाठ, गुलाम शेख, जमीर सय्यद, जावेद सय्यद, अजीम खान, देवेंद्र वाघमारे, शहाबाज शेख, प्रतीक शिंदे, मुन्ना भिंगारदिवे, विल्सन रूकडीकर, प्रवीण भिंगारदिवे, अकिल शेख, राहुल गाडेकर, दिलनवाज शेख, योधन भालेराव आदीं सहभागी झाले होते.

## नगर शहरात ११ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन ॲवॉर्ड सोहळ्याचे आयोजन

### ज्ञानरचना सोशल फाऊंडेशन करणार विविध क्षेत्रातील कर्तुत्ववानांचा गौरव

नगर - विविध क्षेत्रातील कर्तुत्ववानांचा सन्मान करण्यासाठी ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन अवार्ड सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ११ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर मधील सावेडीच्या माऊली सभागृहात रंगणार आहे. विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान व्यक्तींना सदर पुरस्कारासाठी नामांकन पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या पुरस्कार सोहळ्यात कलाविष्कार पुरस्कार, युथ आयकॉन, महाराष्ट्र क्रिडा आयकॉन, महाराष्ट्र उद्योगरत्न, महाराष्ट्र आदर्श शिक्षकरत्न, महाराष्ट्र कृषीभूषण, महाराष्ट्र समाजरत्न, महाराष्ट्र एनजीओ आयकॉन अवॉर्ड, सोशल वर्कर आयकॉन, राज्यस्तरीय उपक्रमशील ग्रामपंचायत पुरस्कार, महाराष्ट्र आदर्श सरपंच, महाराष्ट्र आदर्श ग्राम पुरस्कार, बालशौर्य आदी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

नामांकने पाठवण्यासाठी https://forms.gle/mvKuobDB4HPXDEjL7 या संकेत स्थळाला भेट देऊन माहिती भरावयाची आहे. अधिक माहितीसाठी ९४२३६७३५९१, ९६५३३८१६८४ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

## कल्याण रोडवर भरदिवसा घरफोडी, तर २ ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न

नगर - बंद घराचा सेप्टी दरवाजा तोडून आत प्रवेश करुन घरातील सामानाची उचकापाचक करुन कपाटाचे लॉक तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेला. तसेच अन्य दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न केल्याची घटना ३१ जानेवारी रोजी दुपारी कल्याण रोडवर घडली.

या बाबतची माहिती अशी की शेखर भास्कर उंडे (वय ४६, रा. विदया टॉवर, जाधव पेट्रोल पंपामागे, कल्याण रोड, अ.नगर) यांचे घरी दुपारी कोणी नसताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने सेप्टी दरवाजा उघडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाटाचे ड्रॉवरचे लॉक कशाचेतरी सहाय्याने तोडून लाकडी कपाटातील सामानाची उचकापाचक करुन आत ठेवलेले सोन्याचे चार कॉईन, दोन कर्णफुले, चांदीचे दागिने व १५ हजार रुपये असा ऐवज चोरुन नेला. त्यानंतर चोरट्यांनी शेजारी राहणारे किरण भाऊराव कानडे, यांचे घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटाचे ड्रॉवरचे लॉक कशाचेतरी सहाय्याने उचकाटुन चोरीचा प्रयत्न केला आहे. तसेच चोरांनी किरण कानडे यांचे शेजारी राहणारे डॉ. रामदास जगन्नाथ आचार्य यांचे घराचे बाहेरील सेप्टी डोअरला असलेले लॉक कशाचेतरी सहाय्याने तोडुन चोरीचा प्रयत्न केला.

याप्रकरणी शेखर उंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# तवलेनगर येथे दोघांकडून एका जणास बेदम मारहाण

नगर - काहीएक कारण नसताना दोघांनी शिवीगाळ दमदाटी करीत एकास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना तवले नगर येथे २ फेब्रुवारी रोजी घडली.

या बाबतची माहिती अशी की गणेश एकनाथ चौरे, (वय ३८, रा. रिलायन्स पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, तवलेनगर, नगर) हा संकल्प हॉटेल समोर बसलेला असताना तेथे त्याचे मित्र विशाल काळे व सागर काळे (रा. सुर्यानगर, तपोवन रोड) आले. त्यांनी विनाकारण शिविगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यावेळी चौरे याने त्यांना 'मला का मारता, मी तुम्हाला काय केले आहे. असे विचारले असता त्यांनी पुन्हा शिविगाळ करुन खाली ढकलुन दिले व त्या दोघांनी तेथे पडलेल्या प्लॅस्टीकच्या टेबल व खुर्च्याने त्याच्या डोक्यात, उजव्या हाताचे मनगटाला व उजव्या पायाच्या गुडघ्याला मारुन जखमी केले. त्यानंतर त्यांनी जिवेच ठार मारीन अशी धमकी देवुन तेथून निघुन गेले.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी गणेश चौरे याने दिलेल्या फिर्यादीवरुन विशाल काळे, सागर काळे यांचे विरुध्द मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील कारवाई पोलीस हवालदार गिरीगोसावी हे करीत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### राखा आतड्यांचे आरोग्य

आपल्या शरीरातील सर्वात महत्वाची प्रणाली असलेल्या आपल्या आतड्यांचे आरोग्य, बहुतेकदा दुर्लक्षित केले जाते. जंक फूडमध्ये प्रक्रिया केलेले पदार्थ, ट्रान्स फॅट्स, साखर आणि मीठ जास्त प्रमाणात असते. ते आतड्यांमधील चांगले बॅक्टेरिया नष्ट करते आणि पचन मंदावते. यासाठी हे पदार्थ खाणे शक्यतो टाळावे.

## पाककला

### वरण-भात पकोडे

**साहित्य :** एक कप उरलेले वरण, एक कप उरलेला भात, एक कप बेसन, हिरव्या मिरच्या तुकडे केलेल्या, एक टीस्पून आले किस, एक टीस्पून जिरे, चिमूटभर हिंग, कोथिंबीर, तेल

**कृती :** सर्वात आधी एका बाऊलमध्ये बेसन घ्यावे व ते व्यवस्थित हाताने मॅश करून घ्यावे. आता यामध्ये वरण भात, आले, जिरे, हिंग, कोथिंबीर घालून घट्ट बॅटर बनवून घ्यावे. आता एका कढईमध्ये तेल तापण्यासाठी ठेवावे. आता बाऊलमधील बॅटरचे पकोडे बनवून चांगले क्रिस्पी तळून घ्यावे.

## वास्तू

### शाळेसंबंधी

* आकर्षकरित्या सजविलेल्या मोकळ्या भागात आकर्षक, सुंदर सरस्वतीची मूर्ती असावी. विद्यार्थ्यांनी प्रार्थना करतेवेळी त्याच दिशेने तोंड करावे.

* मुख्य लायब्ररी तथा वाचनालय पश्चिम ते वायव्य भागातच असावी.

* बांधकाम अभियांत्रिकी, जीवशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र विषयांच्या प्रयोगशाळा नैऋत्य भागात असाव्यात.

## सल्ला

उशीचे कव्हर आठवड्यातून एकदा किंवा दोनदा धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे थांबतील आणि पिंपल्स येणार नाहीत.

## सौंदर्य

ज्या सौंदर्यतज्ज्ञांकडून मेक-अप करणार असाल त्यांच्याकडे हेअरस्टाइलची ट्रायल घ्या म्हणजे काही बदल करायचे असल्यास करता येतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५

**रथसप्तमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, अश्विनी २१।५०, सूर्योदय ०६ वा. २४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शत्रूंना मात द्याल. अनेक संघर्ष आणि विघ्नांना करुन यशस्वी व्हाल. आनंदाची बातमी कळेल.

**वृषभ** : कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे धोक्याचे ठरेल.

**मिथुन** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल.

**कर्क** : व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील. दिवस आनंदात जाईल.

**सिंह** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील. वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न कराल. नवे संबंध बनतील.

**कन्या** : वाहने व उपकरणे खराब होतील. नुकसान होणे शक्य आहे. मिळकतीतून लाभ प्राप्ति योग. अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल. मनावरील दडपण दूर.

**तूळ** : मनावर नियंत्रण ठेवाल. पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. व्यापार चांगला होत राहील.

**वृश्चिक** : बेपर्वाईने कार्य करू नका. कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल. जोडीदारा बरोबर तणाव निर्माण होईल.

**धनु** : मागील एखादे बाकी राहिलेले काम आज पूर्ण होईल. उधारी व उसनवारी वसुल होईल.

**मकर** : एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल. वेळ अनुकूल आहे.

**कुंभ** : आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. कौटुंबिक सुख लाभेल. भाग्यवर्धक यश.

**मीन** : कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. आर्थिक पक्षाबाबत सावध राहा. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### सासू

एका दारूड्याने दारू सोडली. मित्राला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'हे अघटीत कसे घडले? तुझ्या व्यसनमुक्तीचे रहस्य काय ?'


दारूड्या म्हणाला 'घडल असं की माझी सासू माझ्याकडे राहायला आली. एकदा नशेत मला एका ऐवजी तीन सासू दिसू लागल्या, तेव्हांपासून मी पिण्याचे एकदम बंद केले.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

६८ हा वन्य जीवन सप्ताह केव्हा साजरा केला गेला? - २ ते ८ ऑक्टोबर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१०६ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७१०५ चे उत्तर**



**उभे शब्द :-** १) पडणे; पतन २) घाई; धांदल; गडबड ३) एक पक्वान्न ४) खळगी; पन्हाळी; खाप; डोंगर वगैरेतील खबदड ५) सत्त्व; परीक्षा; चाचणी ६) चारही बाजू समान व चारही कोन नव्वद अंशाचे असा चौकोन ९) जास्तीतजास्त; अतिशयपणा १०) मराठी पुरुषाचे एक नाव १२) एक फळ १३) चापट; मऊ पदार्थाचा आघात १४) गोलाकार फिरणारा वारा १६) सूर्योदयानंतरचा काही काळ १९) पसरलेले; विस्तृत २०) चिंता; काळजी २१) आठवण; स्मरण

**आडवे शब्द :-** १) जत्रा वगैरेच्या वेळी देवाच्या मूर्तीची ज्यातून मिरवणूक काढतात ते वाहन; मेण्यासारखे वाहन ४) डोक्याला झालेली जखम ७) बिनवासाचे एक फूल ८) बसण्यासाठीचे एक छोटे वस्त्र; आसन १०) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस ११) महिना; माह १२) सदरा; शर्ट वगैरे १४) एक धान्य १५) पराजय; हार १७) कार्य; कर्म; वर्क १८) टपकत पडण्याचा पाण्याचा थेंब; ठपका; दोष २१) झाडाची पाने हलताना होणारा आवाज २२) धडगत; सद्गती; बचाव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : गुरुच्या विचारांची खोली आणि समुद्राची खोली या दोन्हीत एक फरक आहे समुद्राच्या खोलीत माणूस बुडून जातो आणि गुरुच्या विचारांच्या खोलीमुळे माणूस तरतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### टॉर्पेडो म्हणजे काय?

टॉर्पेडो म्हणजे सिगारेटच्या आकाराचे, पाण्यात शत्रूची जहाजे बुडवण्यासाठी पाणबुडीतून सोडायचे अस्त्र. ते अडथळ्यावर आपटताच स्फोट घडतो. रॉबर्ट व्हाईटहेड या ब्रिटिश अभियंत्याने इ. स. १८६६ मध्ये टॉर्पेडोचा शोध लावला. यानंतर टॉर्पेडोत खूप सुधारणा झाल्या. यामुळे टॉर्पेडोंची अचूकता वाढली. टॉर्पेडोचे साधारणतः तीन भाग असतात. पहिल्या भागात म्हणजे शेपटात स्फोटक द्रव्ये आणि त्यांचा स्फोट घडवून आणण्याची यंत्रणा असते. दुसऱ्या भागात दिशादेशन करणारी यंत्रणा असते. तर तिसऱ्या भागात म्हणजे नाकाडात प्रचंड दाबाखाली हवा भरलेली असते. या हवेमुळे टॉर्पेडो त्याच्या प्रवासात वेडावाकडा जात नाही. त्याला स्थैर्य प्राप्त होत असते. टॉर्पेडोला मराठीत पाणतीर असे म्हणतात.

### टोळ आणि मुंगी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. उन्हाळ्याचा हंगाम होता आणि एक मुंगी स्वतःसाठी धान्य गोळा करण्यासाठी खूप मेहनत करत होती. मुंगी बरेच दिवस या कामात व्यस्त होती. ती दररोज शेतातून धान्य गोळा करायची आणि ती तिच्या बिळात जमा करायची. तसेच जवळच एक टोळ उडी मारत होता. तो आनंदाने नाचत होता. घामाने भिजलेली मुंगी धान्य वाहून नेऊन थकली होती. ती पाठीवर धान्य घेऊन तिच्या बिळाकडे जात होती, तेव्हा अचानक टोळ तिच्या समोर आला. तो म्हणाला मुंगी तू इतकी मेहनत का करत आहे? चल मजा करूया. मुंगीने टोळाकडे दुर्लक्ष केले आणि शेतातून एक एक करून धान्य उचलत राहिली आणि ती तिच्या बिळात जमा करत राहिली.

आता टोळ मुंगीला पाहून हसायला लागला आणि तिची चेष्टा करायला लागला. तो तिच्या वाटेत उडी मारून म्हणायचा मुंगी माझे गाणे ऐक. किती छान हवामान आहे. थंड वारा वाहत आहे. सोनेरी सूर्यप्रकाश आहे. कठोर परिश्रम करून तुम्ही हा सुंदर दिवस का खराब करत आहात? टोळाच्या कृत्यांमुळे मुंगी अस्वस्थ झाली. तिने त्याला समजावून सांगितले. मुंगी म्हणाली ऐक टोळ, काही दिवसांतच हिवाळा येणार आहे. मग खूप बर्फ पडेल. धान्य कुठेही मिळणार नाही. माझा सल्ला असा आहे की, तुमच्या जेवणाची व्यवस्था करा. पण टोळ ने तिच्याकडे दुर्लक्ष केले.

हळूहळू उन्हाळा संपत आला. मौजमजेत बुडालेल्या त्या टोळाला उन्हाळा कधी संपला हे कळलेच नाही. पाऊस पडल्यानंतर थंडी पडली. धुके आणि बर्फवृष्टीमुळे सूर्य क्वचितच दिसत होता. टोळांनी त्यांच्या खाण्यासाठी धान्य गोळा केले नाही. सर्वत्र बर्फाची जाड चादर पसरलेली होती. टोळ भुकेने त्रस्त होऊ लागला. टोळांकडे बर्फवृष्टी आणि थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी कोणतेही साधन नव्हते. मग त्याची नजर मुंगीवर पडली. मुंगी तिच्या बिळात साठवलेले धान्य आनंदाने खात होती. मग त्या टोळाच्या लक्षात आले की त्याला त्याचा वेळ वाया घालवल्याबद्दल शिक्षा मिळाली होती. मुंगी दयाळू होती. भूक आणि थंडीने त्रस्त असलेल्या टोळाला मुंगीने पुन्हा मदत केली. त्याला खायला काही धान्य दिले. थंडीपासून स्वतःला वाचवण्यासाठी मुंगीने भरपूर गवत आणि पेंढा गोळा केला होता. तिने टोळला त्याचे घर बांधण्यास सांगितले. अश्या प्रकारे थंडीपासून टोळ चे रक्षण झाले.

**तात्पर्य :** आपण आपले काम मेहतीने पूर्ण करावे, अनेक लोक थट्टा करतात, पण नंतर तेच तुमची प्रशंसा करतात.



## रहमते दर्शन (भाग - १)

मंद-मंद मुस्कराये और बोले, देखो, मैंने तुम्हें पहले ही कह दिया था। कि चिंता करने की आवश्यकता नहीं है। मैं शुक्राने के आँसू बहाते हुए उनके चरणों में गिर पड़ा। एक सप्ताह के अन्दर ही मुझे अपने बेटे का पत्र भी मिल गया, जिसमें उसने लिखा था कि यह ऑपरेशन बहुत ही खतरनाक और नाजुक था और सारे भारत में एक ही डॉक्टर था, जो इस ऑपरेशन को कर सकता था। उस डॉक्टर को विशेषतया उसके लिए बुलाया गया। पूरे ऑपरेशन के दौरान महाराज जी उसके बिस्तर के पास बैठे हुए, ऑपरेशन की सारी प्रक्रिया का निरीक्षण करते रहे। पत्र में आगे लिखा था, पापाजी, महाराज जी को मेरी तरफ से इस महान दया और कृपा के लिए धन्यवाद दे दीजिये।

मेरा पुत्र अभी भी भारतीय वायुसेना में विंग कमांडर के पद पर नियुक्त है। संत दर्शनसिंह जी महाराज का कोटि-कोटि धन्यवाद । इन अनोखी और अभूतपूर्व दया - मेहर की घटनाओं से क्या

### अपार दया-मेहर

यह प्रमाणित नहीं होता है कि उन्हें हर समय अपने हर बच्चे का ख़्याल रहता है और वे अपने बच्चों की सहायता हेतु तुरंत अपना दया-मेहर भरा हाथ बढ़ा देते हैं और उसमें कोई ढील या देरी नहीं करते।

अपने हर स्वास से मैं संत दर्शनसिंह जी महाराज का उनकी महान कृपाओं के प्रति अभार व्यक्त करता हूँ।

-----------------

### महान रक्षक

हुजूर संत राजिन्दर सिंह जी महाराज की आज्ञा अनुसार जिस घटना का मैं यहाँ वर्णन करना चाहता हूँ, उसका उद्देश्य हमारी उस दिव्य शक्ति में निष्ठा को पक्का करना है, जिसके द्वारा नामदान के समय से ही हम पर दया - मेहर की वर्षा होती है या यूँ कहिये कि जिन जीवों को पूर्ण सतगुरु द्वारा दीक्षित होना होता है, उनकी रक्षा उनके जन्म लेने के समय से ही आरंभ हो जाती है। मैं अपने माता-पिता का भी बहुत-बहुत धन्यवाद करना चाहता हूँ जिन्होंने जन्म के समय से ही मुझे उचित मार्ग पर डाला और मौजूदा सतगुरु के चरणों में मेरे विश्वास को दृढ़ करवाया। अब मैं जिस घटना का ज़िक्र करने जा रहा हूँ वो सन् १९८५ में घटी जब मैंने अपनी कार मरम्मत के लिए दी हुई थी और मैं अपना सारा काम मोटर साइकिल से कर रहा था। हुआ यूँ कि मैंने उसी दिन अपनी मोटर साइकिल की सर्विस करायी थी और वो खूब ठीक काम कर रही थी । रात को जब मैं काम से घर आ रहा था तो मैं अपनी मोटर साइकिल को ७०-८० किलोमीटर प्रति घंटे की रफ्तार से एक ऐसी उबड़-खाबड़ सड़क पर चला रहा था जोकि साधारण मिट्टी से भरी हुई थी और जगह-जगह गड्ढे हो गये थे। जब मैं पूरी गति से मोटर साइकिल पर जा रहा था तो मुझे दूर से ही सड़क पर एक गड्ढे का परन्तु मैंने आभास हुआ। मैंने आपातकालीन ब्रेक लगाने की सोची। जैसे ही ब्रेक लगाये, मेरे आश्चर्य का ठिकाना नहीं रहा कि ब्रेकों ने काम ही नहीं किया ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

लिखने वाले ने यह लिखा कि तुम्हारे पुत्र का ऑपरेशन सफलतापूर्वक सम्पन्न हो गया है और वह ख़तरे से बाहर है, अधिक विवरण के लिए पत्र का इंतज़ार करो। महाराज जी के प्रति गद्गद् होकर वह तार मैंने उनके हाथों में सौंप दिया। मंद-मंद मुस्कराये और बोले, देखो, मैंने तुम्हें पहले ही कह दिया था। कि चिंता करने की आवश्यकता नहीं है। मैं शुक्राने के आँसू बहाते हुए उनके चरणों में गिर पड़ा। एक सप्ताह के अन्दर ही मुझे अपने बेटे का पत्र भी मिल गया, जिसमें उसने लिखा था कि यह ऑपरेशन बहुत ही खतरनाक और नाजुक था और सारे भारत में एक ही डॉक्टर था, जो इस ऑपरेशन को कर सकता था। उस डॉक्टर को विशेषतया उसके लिए बुलाया गया। पूरे ऑपरेशन के दौरान महाराज जी उसके बिस्तर के पास बैठे हुए, ऑपरेशन की सारी प्रक्रिया का निरीक्षण करते रहे। पत्र में आगे लिखा था, पापाजी, महाराज जी को मेरी तरफ से इस महान दया और कृपा के लिए धन्यवाद दे दीजिये।

मेरा पुत्र अभी भी भारतीय वायुसेना में विंग कमांडर के पद पर नियुक्त है। संत दर्शनसिंह जी

### दिमाग की शक्ती

महाराज का कोटि-कोटि धन्यवाद । इन अनोखी और अभूतपूर्व दया - मेहर की घटनाओं से क्या यह प्रमाणित नहीं होता है कि उन्हें हर समय अपने हर बच्चे का ख़्याल रहता है और वे अपने बच्चों की सहायता हेतु तुरंत अपना दया-मेहर भरा हाथ बढ़ा देते हैं और उसमें कोई ढील या देरी नहीं करते।

अपने हर स्वास से मैं संत दर्शनसिंह जी महाराज का उनकी महान कृपाओं के प्रति अभार व्यक्त करता हूँ। समय दुनिया में सब कुछ है परंतु लोगों के मन कंगाल हैं। मंसा सेवा कर के लोगों के मन में अपने पन की भावना जागृत करने की सेवा करें और उनका धन विश्व सेवा में लगवायें इस के लिये बहुत गहरे योग का अभ्यास करें। जब लोग सोचते हैं कि उन्होंने पर्याप्त विकास कर लिया है, वह बहुत अच्छे योगी हैं, बहुत अच्छे वक्ता हैं, सारी दुनिया उन्हें मान्यता देती है तो वह सीखना छोड़ देते हैं। यही सोच उनके पतन का कारण बन जाती है। उनकी प्रगति थम जाती है और धीरे-धीरे उन में गिरावट आने लगती है। आत्मा लोहा है। लोहा जब तक आग में रहता है, लाल रहता है। आग से निकलते ही धीरे-धीरे ठंडा होने लगता है और अंत में फिर काला बन जाता है। हमें मरते दम तक भगवान की याद में डूबे रहना है। यही स्टेज आप को व्यक्ति और वस्तुओं के लगाव से मुक्त रखेगी। यही मानसिक दशा विश्व का कल्याण करेगी। अपने मानसिक विकास में निवेश करें और बाकी खर्चों में कटौती करें तभी चीजों की गुलामी हटेगी।

अपनी नौकरी में आप जितनी मेहनत करते हैं, उस से ज्यादा मेहनत खुद पर करनी चाहिए। आप की आमदनी अर्थव्यवस्था से नहीं बल्कि आप के दर्शन से जुड़ी है। अपनी परिस्थितियों को बदलने के लिये पहले खुद को बदलो। आप किसी को जो सब से बड़ा तोहफा दे सकते हैं वह है आप का खुद का व्यक्तिगत विकास । खुद का विकास करने पर ही आप दूसरों का विकास करने में सक्षम बनते हैं। आप अगर डॉक्टर हैं तो दूसरों को डॉक्टर बना सकते हैं। आप अगर धनवान हैं तो दूसरों को धनवान बना सकते है, दान कर सकते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

बाळाचे अवयव, त्वचा अतिशय नाजूक असतात; त्यामुळे हळुवार व प्रेमाने बाळाला अभ्यंग करावे अंघोळ अंघोळीचे पाणी फार गरम अथवा गार असू नये. बाळाला सोसवेल अशा कोमट पाण्याने बाळाला अंघोळ घालावी. चंदन, गुलाब, अनंतमूळ, हळद व मसुरीची डाळ यांचे वस्त्रगाळ चूर्ण दुधाच्या सायीमध्ये भिजवावे व याचे मिश्रण बाळाला लावावे. हे उटणे लावताना अभ्यंगासारखेच खालून वर अशी दिशा ठेवावी. असे उटणे लावून अंघोळ घातल्यास बाळाची त्वचा कांतीयुक्त सतेज होते व त्यावरील लव देखील नाहीशी होते. यासाठीच आपण दूर्वांकुर बेबीवॉश उटणे बनविलेले आहे त्याचा वापर दुधाच्या सायीमधून करावा. साबण लावून अंघोळ घातल्यास बाळाची त्वचा रुक्ष, कोरडी पडते; म्हणून साबणाऐवजी उटण्याचा वापर करावा. अंघोळ घातल्यावर मऊ, सुती वस्त्राने बाळाचे अंग हलक्या हाताने कोरडे करून पुसून घ्यावे.

### नवजात बालकाची परिचर्या

**धुरी :**

अंघोळीनंतर रोज बाळाला धुरी द्यावी; त्यामुळे बाळाला सर्दी, खोकला, ताप असे आजार वारंवार होत नाही. धुरी देण्यासाठी लागणारे कोळसे आधीच पेटवून ठेवावे. कोळशाच्या निखाऱ्यावर बाळंतशेपा, ओवा टाकावा व त्याची बाळाला व्यवस्थित धुरी द्यावी. धुरी देण्यासाठी छिद्रे असलेली टोपली वापरली, तर धूर राहत नाही व बाळाला व्यवस्थित धुरी देता येते.

**बाळाचे कपडे :**

बाळाला वापरण्याची दुपटी तसेच घालण्याचे कपडे स्वच्छ, सुती असावेत. बाळासाठी वापरावयाची दपटी व्यवस्थित टीपा मारून घ्यावीत. म्हणजे त्याचे धागे बाळाच्या अवयवात अडकून बाळाला इजा होणार नाही. बाळाच्या प्रत्येक शी-शु नंतर दुपटी स्वच्छ धुवावीत. केलेली दुपटी न धुता पुन्हा वापरू नयेत, कारण त्यामुळे बाळाला जंतुसंसर्ग होण्याची भीती असते. बाळाचे कपडे स्वच्छ धुतल्यावर उन्हामध्ये चांगले वाळवावेत. वाळवल्यानंतर झटकन इस्त्री करून घ्यावेत. कदाचित त्यावर मुंग्या व कीटक असले तर दिसून येतात. इस्त्री झाल्यावर कपड्यांची घडी घालून त्यालाही धुरी द्यावी. धुरीसाठी वावडींग, शेपा, ओवा यांचा वापर करावा. बाळाला अतिघट्ट तसेच नायलॉनचे कपडे वापरू नयेत. या कपड्यांमुळे घाम येऊन बाळाला पुरळ येण्याची शक्यता असते. काही बाळांचे नातेवाईक प्रसूतीनंतर बाळ पाच दिवसांचे होईपर्यंत बाळाला नवीन कपडे घालत नाहीत. ही अतिशय चुकीची पद्धत आहे, कारण पोटात असताना बाळ आईच्या उबदार कुशीमध्ये असते व जन्मानंतर त्याला उबदार वातावरणाची गरज असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी अहिल्यानगरचे सतीश (बाबूशेठ) लोढा



नगर – नवी दिल्ली स्थित अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नगर येथील मर्चटस व्यापारी सतीश (बाबूशेठ) नारायणदास लोढा यांची निवड झाली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन, महामंत्री अमित राय यांनी लोढा यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

माजी राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश चोरडिया, पारस मोदी यांच्या मार्गदर्शनाने ही निवड करण्यात आली आहे.

सतीश लोढा हे अहिल्यानगर जैन श्रावक संघ, धार्मिक परीक्षा बोर्ड, जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल, महावीरनगर श्रावक संघात अनेक वर्षांपासून सक्रीय योगदान देत आहेत. सामाजिक, धार्मिक, आरोग्य, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात ते सक्रिय आहेत. साधू साध्वीजींच्या सेवेत ते नेहमी अग्रेसर असतात.

या निवडीबद्दल बोलताना सतीश लोढा म्हणाले की, जैन कॉन्फरन्स ही राष्ट्रीय पातळीवरील जैन समाजाची शिखर संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून देशाच्या कानाकोपऱ्यातील जैन समाज बांधवांसाठी काम केले जाते. या संस्थेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी झालेली निवड आनंददायी आहे. पदाच्या माध्यमातून समाजासाठी भरीव कार्य करण्याचा प्रयत्न राहील.

# ग्रेड चित्रकला परीक्षेत 'समर्थ शाळेचा' विक्रम

नगर – महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या ग्रेड चित्रकला परीक्षेत समर्थ शाळेचा सांगळे गल्ली विभागाने विक्रम केला असून या परीक्षेत शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली आहे.

यावर्षी घेण्यात आलेल्या शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेत शाळेतील ५४ विद्यार्थ्यांनी 'ए' ग्रेड, ४८ विद्यार्थ्यांनी 'बी' ग्रेड व ३६ विद्यार्थ्यांनी 'सी' ग्रेड प्राप्त केली. या सर्व विद्यार्थ्यांना कला शिक्षक संदीप गायकवाड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.



महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या ग्रेड चित्रकला परीक्षेत समर्थ शाळा सांगळे गल्ली विभागाने विक्रम केला असून या परीक्षेत शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम ठेवल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, संस्थेचे व्हा.चेअरमन व शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव प्र. स. ओहोळ व सुरेश क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

मुख्याध्यापक अजय महाजन यांच्या संकल्पनेतून शाळेत विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात तसेच विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी त्यांचे प्रोत्साहन लाभते त्यामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाले. याबद्दल त्यांचे खजिनदार संजय कुलकर्णी, संस्थेचे सदस्य व शालेय समिती चेअरमन स्वप्निल कुलकर्णी, संस्थेचे सदस्य ॲड. किशोर देशपांडे, सौ. संध्या कुलकर्णी, विकास सोनटक्के, ॲड. वेद देशपांडे, सुनिल जोशी, इंजि.सचिन क्षीरसागर, स्वप्निल सोनटक्के यांनी कौतुक केले आहे.

# जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय मंत्रिपदी नगर येथील वसंत लोढा यांची निवड

नगर – नवी दिल्ली येथील श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीयमंत्रीपदी दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा यांची निवड करण्यात आली आहे.



नवी दिल्ली येथे जैन कॉन्फरन्स च्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन यांनी वसंत लोढा यांची राष्ट्रीय मंत्रीपदी नियुक्ती जाहीर केली आहे.

भारतीय जनता पार्टीचे वसंत लोढा यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, कला सर्वच क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय मंत्रिपदी निवड करण्यात आलेली आहे.

# श्री समर्थ मंडळ आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धेत ४१ संघाचा सहभाग

नगर – येथील श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ अहिल्यानगर या शैक्षणिक संस्थेने दासनवमी उत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला येथे सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत शहरातून जवळपास ४१ संघानी सक्रीय सहभाग घेतला होता. या स्पर्धा उत्साही वातावरणामध्ये पार पडल्या.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन अँड. किशोर देशपांडे, सांगळेगल्ली माध्य विभागाचे शालेय समिती चेअरमन स्वप्निल कुलकर्णी, दासनवमी उत्सव प्रमुख व मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, कार्यकरिणी सदस्या संध्या कुलकर्णी, सांगळेगल्ली माध्य विभागाचे मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, सावेडी प्राथ विभागाचे सौ. धनश्री गुंफेकर, सांगळेगल्ली प्राथ विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, पर्यवेक्षक सुनिल कानडे आदी उपस्थित होते.



श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळने सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला येथे सूर्यनमस्कार स्पर्धा पार पडल्या. (छाया – उदय जोशी)

श्रीपाद कुलकर्णी म्हणाले सूर्यनमस्कारात सर्व आसनाचा समावेश असल्याने हे आसने सर्वानी नियमित करावीत रोगमुक्त, तणावमुक्त, राहण्यासाठी समृध्दी व शांतता आणण्यासाठी सकाळी व संध्याकाळी एक तास योगासाठी देणे आवश्यक आहे. सूर्यनमस्कार हा सर्वांग सुंदर व्यायाम आहे. श्री समर्थ रामदास स्वामीनी आयुष्यभर सूर्यनमस्कार घालत बलोपासना केली श्री समर्थ रामदास स्वामी हे भारत व महाराष्ट्रातील एक संत जे बलोपासना करत होते. शक्तीची उपासना करणारे संत श्री समर्थ रामदास स्वामी होते सूर्यनमस्काराचे फायदे व बलोपासनेचे महत्व त्यांनी यावेळी सांगितले.

या सर्व स्पर्धेचे परिक्षण सावेडी येथील योग विद्याधाम समितीचे माणिक आडाणे, त्यांचे २५ सहकारी बंधू भगिनी केले. या संघासोबत अनेक शाळेचे मागदशक उपस्थित होते. समवेत संघाना सौ. मोहिनी कुलकर्णी, सौ.ज्योती कोहकडे यांनी मार्गदशन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संकेत शिंदे यांनी केले. आभार क्रिडा विभागप्रमुख पोपट लोंढे यांनी मानले.

# ५ फेब्रुवारीला सहकार दिंडीचे नगर शहरात आगमन

नगर – शिर्डी येथे ९ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय सहकार परिषद होणार आहे. या पार्श्वभूमीवर सहकार दिंडीचे प्रस्थान नागपूर येथून २९ जानेवारीला झालेले आहे. साकार दिंडी ५ फेब्रुवारी अहिल्यानगर शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आगमन होणार आहे. यानंतर सहकार दिंडीची शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून नगर शहरातील प्रमुख मार्गावरून जाणार आहे. सहकार दिंडीची शोभायात्रा माळीवाडा वेस, माणिक चौक, कापड बाजार, तेली खुंट, डाळमंडई, रामचंद्र खुंट, वसंत टॉकीज मार्गे मार्केटयार्ड येथे दिंडीचा समारोप होणार आहे.

या सहकार दिंडीचे स्वागत पद्मश्री पोपटराव पवार, महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, राष्ट्रीय मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, तालुका फेडरेशनचे अध्यक्ष किसनराव लोटके, राजीव गांधी पतसंस्थेचे संस्थापक उद्धवराव दुसुंगे, मराठा सेवा पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब काळे, रेणुका माता पतसंस्थेचे प्रशांत भालेराव, महात्मा फुले पतसंस्थेचे शरद झोडगे, जैन ओसवालचे किरण भंडारी, मार्कंडेय सहकारी पतसंस्थेचे चेअरमन नारायण कोडम, नगर तालुका उपनिबंधक डॉक्टर शुभांगी गोंड आदी उपस्थित राहणार आहेत.

यानंतर सहकार दिंडीचे प्रस्थान अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी, श्रीरामपूर, राहता, मार्गे शिर्डी येथे ७ फेब्रुवारी रोजी पोहोचणार आहे. अशी माहिती नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी दिली आहे.

# सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल

नगर – अहिल्यानगर येथील MSBTE APPROVED सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल महाविद्यालयाचा १००% निकाल लागला आहे. या हिवाळी परीक्षा २०२४ चा निकाल लागला







असून अनुक्रमे प्रथम क्रमांक पल्लवी नरेंद्र सिंह -९१%, द्वितीय क्रमांक नेहा संजय सावंत ९०%, तृतीय क्रमांक सुरभी मिश्रा ८९% अशा अनुक्रमे यश मिळवून गुणवत्ता यादीत आले आहेत.

संस्थेचे संचालक हिरालाल लुनावत सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रितेश जैन, सौ.मनीषा बोरा, सौ. किरण पवार, दीपक ठोंबरे सर व ओंकार बेलेकर सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# नागरिकांच्या मागणीनुसार १००% शास्तीमाफीसाठी आणखी १५ दिवस मुदतवाढ

**१५ फेब्रुवारीपर्यंत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १००% सवलत; १५ दिवसात सवलत घेऊन थकीत कराचा भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी : मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर – महानगरपालिकेने मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली वाढवण्यासाठी मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत जाहीर केली आहे. त्यानुसार जानेवारी अखेर १०० टक्के शास्ती माफ करण्यात आली होती. यात ८८४५ मालमत्ता धारकांनी सवलतीचा लाभ घेतला. आता नागरिकांच्या मागणीनुसार १५ फेब्रुवारीपर्यंत शास्तीमध्ये १०० टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. १५ दिवस मुदत वाढवून देण्यात आली असून, थकबाकीदार नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा व जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

महानगरपालिकेने ८ ते ३१ जानेवारी या कालावधीत १०० टक्के शास्तीमध्ये सवलत दिली होती. तर फेब्रुवारी महिन्यात ७५ टक्के सवलत दिली होती. जानेवारी महिन्यात ८८४५ थकबाकीदारांनी सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा केला. मात्र, नागरिकांकडून १०० टक्के शास्ती माफीसाठी मुदत वाढवून देण्याची मागणी सातत्याने होत होती. त्याचा विचार करून आता १५ फेब्रुवारी पर्यंत १०० टक्के शास्तीमाफीची मुदत वाढवून देण्यात आली आहे.

थकबाकीदारांनी या १०० टक्के सवलत योजनेचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा. महानगरपालिका प्रशासनाने सर्व प्रभाग समिती कार्यालय अंतर्गत थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे. जप्ती कारवाई सुरू असून, १५ फेब्रुवारीनंतर ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे. त्यामुळे जप्तीची कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदार मालमत्ता धारकांनी सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळेत माता पालकांचा हळदी-कुंकू समारंभ

**महिला सक्षमीकरणाने विकास; तर मुलांवर संस्कार रुजविल्यास समाज घडणार : मुख्याध्यापिका अनिताताई काळे**

नगर – भिस्तबाग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माता पालक मेळाव्यात हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडले. या हळदी-कुंकू कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाचा जागर करुन मुलांवर संस्कार घडविण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा पार पडल्या.



भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत माता पालकांचा हळदी-कुंकू समारंभ उत्साहात झाला.

जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या हळदी-कुंकूच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका शारदाताई ढवण, सहशिक्षिका शितल आवारे, सुरेखा वाघ, रोहिणी ससे, माधुरी चोथे, अनुजा घुले, अमृता वाघमारे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा सरला ढवण, संगीता कजबे, ज्योती लाटे, अहिल्या सांगळे, योगिता वाघमारे, सविता काजळकर आदींसह माता पालक उपस्थित होत्या.

अनिता काळे म्हणाल्या की, महिला सक्षम झाल्यास समाजाचा विकास साधला जाणार आहे. तर मुलांवर संस्कार रुजविल्यास समाज घडणार आहे. मुलांना घडविताना शिक्षणाबरोबर संस्कार महत्त्वाचे आहेत. सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांचा वारसा चालविताना त्यांचा आदर्श समोर ठेऊन वाटचाल करण्याची गरज आहे. महिलांनी उंबरठा ओलांडून स्वत:चे कर्तृत्व सिध्द करण्याचे त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमात महिलांचे उखाना स्पर्धा, संगित खुर्ची आदींसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या विविध स्पर्धा पाहण्याचा आनंद लुटला. विजेत्या महिलांना बक्षीस देण्यात आले.

यावेळी उपस्थित महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून वाण दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल आवारे यांनी केले. आभार सुरेखा वाघ यांनी मानले.

# अहमदनगर पोस्टल डिव्हीजन सोसायटीला राज्यस्तरीय बँको पतसंस्था पुरस्कार प्रदान

नगर – कोल्हापूर येथील अविज पब्लीकेशन वतीने देण्यात येणारा बँको पगारदार पतसंस्था पुरस्कार यावर्षी अहमदनगर पोस्टल डिव्हीजन को ऑप क्रेडीट सोसायटीला प्रदान करण्यात आला.



अहमदनगर पोस्टल डिव्हीजन सोसायटीला राज्यस्तरीय बँको पतसंस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दरवर्षी राज्यातील विविध सहकारी संस्थांना उल्लेखनीय कार्याद्दल हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार सोहळा नुकताच लोणावळा येथील ॲम्बेव्हॅली येथे आयोजित करण्यात आला होता. हा पुरस्कार माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेचे चेअमरमन रामेश्वर ढाकणे, संचालक निसार शेख, सलीम शेख व व्यवस्थापक नितीन वाघ यांनी स्विकारला.

यावेळी बँको मासिकाचे संपादक अविनाश गुंडाळे सह विविध संस्थाचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते. या पुरस्काराकरीता संस्थेची आर्थिक स्थिती, सामाजिक कार्य, ऑडिट वर्ग, सभासदांच्या ठेवी व कर्ज, थकबाकीचे प्रमाण यासह २० निकषावर खरे उतरत संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या या संस्थेने यावर्षी १०५ व्यावर्षात पर्दापन केलेले असून संस्थेस पगारदार पतसंस्था विभागातील राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त करण्यासाठी सेक्रेटरी प्रफुल्लकुमार काळे, संचालक प्रमोद कदम, अमीत कोरडे, महेश तामटे, किशोर नेमाने, बळी जायभाय, सुनील कुलकर्णी, शिवाजी कांबळे, संचालिका अर्चना दहिंडे, स्वप्ना चिलवर आदीनी प्रयत्न केले.



महाराष्ट्र राज्य संघाच्या उपाध्यक्षपदी आमदार संग्राम जगताप यांची नियुक्ती करण्यात आली.

# महाराष्ट्र राज्य संघाच्या उपाध्यक्षपदी आमदार संग्राम जगताप यांची नियुक्ती

नगर – अहिल्यानगर मध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा राज्य अध्यक्ष रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यामध्ये राज्य कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्षपदी आमदार संग्राम जगताप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी राज्य कार्याध्यक्ष पै. संदिप भोंडवे, उपाध्यक्ष प्रा. पै. विलास कथुरे, पै. हनुमंत गावडे, महाराष्ट्र केसरी पै. बापू लोखंडे, अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ आदींसह राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप यांच्या नियुक्तीचा ठराव राज्य उपाध्यक्ष संदीप भोंडवे यांनी मांडला त्यास उपाध्यक्ष विलास कथुरे यांनी अनुमोदन दिले.

# भिंगारच्या श्री विशाल गणेश मंदिरात महिलांची मोफत नेत्र तपासणी

**महिलांनी भरले नेत्रदान व अवयव दानाचे संकल्प अर्ज : गणेश जयंतीचा उपक्रम**

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशन व सम्राट तरुण मंडळाच्या वतीने वतीने भिंगार येथील गणेश जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. गवळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिरात झालेल्या या शिबिरास महिला भाविकांचा प्रतिसाद लाभला. तसेच यावेळी मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाची जागृती करण्यात आली. नेत्रदान व अवयव दानाचा संकल्प केलेल्या महिलांनी अर्ज भरुन दिले.



भिंगारच्या श्री विशाल गणेश मंदिरात महिलांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. याप्रसंगी नेत्रदान व अवयव दानाचा संकल्प केलेल्या महिलांनी अर्ज भरुन दिले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, समाजात मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान होत नसल्याने अनेक रुग्ण नेत्र व अवयवाच्या प्रतिक्षेत आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानाने सात व्यक्तींना जीवदान मिळते. शरीर हे नश्वर असून, मरणोत्तर अवयवदानाने एखाद्याचे जीवन फुलणार आहे. तर या शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना आधार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांनी धकाधकीच्या जीवनात आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. गरजू महिलांवर मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचे त्यांनी माहिती दिली.

या शिबिरात सहभागी गरजूंना अल्पदरात चष्म्यांचे आणि मोफत औषधाचे वाटप करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशन व सम्राट तरुण मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# अर्थजगत

अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी २०२५-२६ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला. मोदी ३.० सरकारच्या कार्यकाळातील हा पहिला पूर्ण अर्थसंकल्प. जुलै २०२४ मध्ये सादर केलेला अर्थसंकल्प हा अंतरीम होता. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पाकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले होते. विशेषतः जागतिक पटलावरील बदलत्या घडामोडींचा भारताच्या अर्थकारणावर नकारात्मक परिणाम होत आहे. तसेच अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून येणाऱ्या काळात जाहीर होऊ शकणाऱ्या आयातशुल्कातील वाढीसारख्या धोरणांचे आव्हान अर्थव्यवस्थेपुढे आहे. या सर्वांतून 'विकसित भारत'ला पूरक अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला. या अर्थसंकल्पातून नेमके काय साधले? याबाबत विश्लेषकांचे म्हणणे काय आहे?



## हक्काच्या निवाऱ्याला नवी बळकटी

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शनिवार, १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर केलेल्या २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्रधानमंत्री आवास योजनेसाठी १९,७९४ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. यानुसार शहरी भागासाठी या योजनेच्या निधीमध्ये ३६ टक्के वाढ झाली असून ती गेल्या जुलैच्या अर्थसंकल्पाच्या सुधारित अंदाजापेक्षा १३,६७० रुपये जास्त आहे. २०१५ मध्ये स्थापन झाल्यापासून, प्रधानमंत्री आवास योजना मोदी सरकारच्या प्रमुख उपक्रमांपैकी एक बनली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटून गेली तरी खूप मोठ्या लोकसंख्येकडे स्वतःचे हक्काचे घर नाही, हे लक्षात घेऊन केंद्रात सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान मोदींच्या संकल्पनेतून या योजनेचा उगम झाला. याद्वारे शहरी आणि ग्रामीण भागात किफायतशीर दरामध्ये निवारा उपलब्ध करून देण्यासाठी कमी किमतीच्या गृहनिर्माण प्रकल्पांना प्रोत्साहन देऊन नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यास सुरुवात झाली. वास्तविक, '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' या घोषणेसह ही योजना जाहीर करण्यात आली; पण कोविड महामारीमुळे हे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. जी सरकारने सलग तिसऱ्या कार्यकाळात अद्याप गाठलेली नाही.

या योजनेत शहरी भागात आतापर्यंत ११.८६ दशलक्ष घरे मंजूर झाली असून यापैकी ९ दशलक्ष घरे पूर्ण झाली आहेत. यासाठी ८ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना टिकाऊ घरे बांधण्यासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने आखलेल्या पीएमएवाय-ग्रामीण योजनेंतर्गत २६ जानेवारी २०२५ पर्यंत ३२.३ दशलक्ष घरे मंजूर करण्यात आली असून यापैकी २६.९ दशलक्ष घरे पूर्ण झाली आहेत. २०२३-२४ आर्थिक वर्षात प्रत्यक्ष खर्च ७९,५९० कोटींच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा लक्षणीयरीत्या कमी म्हणजे ५४,१०३ कोटी होता. तरीही जुलै २०२४ च्या अर्थसंकल्पात सरकारने या कार्यक्रमासाठी वाढीव तरतूद केली. महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये वाटप वाढवण्यामागे आगामी निवडणुकांचे कारण होते. या राज्यांत केवळ ग्रामीण लोकसंख्याच मोठी नाही तर मुंबई, गुरुग्राम, पुणे आणि नागपूरसारखी प्रमुख शहरी केंद्रे देखील आहेत. सरकारच्या अपेक्षेनुसार या योजनेचा प्रभाव मतदारांमध्ये जोरदारपणे जाणवलाही.

### बांधकाम क्षेत्र

अर्थात, राजकारणापलीकडे जाऊन सरकार आणि विशेषतः पंतप्रधान या योजनेसाठी निःस्पृहपणे आग्रही आहेत. त्यामुळेच यंदाच्या अर्थसंकल्पातील वाढीतून अधिकाधिक नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत मिळेल. पीएम आवास योजनेचा सर्वाधिक लाभ उत्तर प्रदेशाला झाला असून तेथील १७.५४ लाख लाभार्थ्यांना हक्काचा निवारा या योजनेतून मिळाला आहे. २०२९ पर्यंत अतिरिक्त ३ कोटी लोकांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

परवडणाऱ्या घरांच्या योजनेमुळे बांधकाम क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे. त्याचबरोबर भारतातील झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या शहरांमधील घरांची गरज पूर्ण करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## ग्रामविकासाला चालना देणारा अर्थसंकल्प

■ रंगनाथ कोकणे
ग्रामीण अर्थकारणाचे अभ्यासक

गेल्या दशकातील मोदी सरकारच्या धोरणांचा किंवा कार्यपद्धतीचा पॅटर्न पाहिला तर खेडे आणि खेड्यात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. खेडी स्वयंपूर्णच नव्हे तर डिजिटल करण्यासाठी गेल्या १० वर्षांमध्ये नियोजनबद्ध प्रयत्न झाले. पण, अजूनही गावांना सरकारी मदतीची गरज आहे. अशा स्थितीत यावेळच्या अर्थसंकल्पात ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी वित्तमंत्र्यांच्या पोतडीतून काय मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. वित्तमंत्र्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात २.६६ लाख कोटींची तरतूद ग्रामीण विकासासाठी केली आहे. २०२४ मध्ये ही तरतूद १.८४ लाख कोटी इतकी होती.

ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीप्रधान आहे. त्यामुळे कृषीक्षेत्राच्या विकासाचा अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण विकासावर होतो. रस्ते, सिंचन सुविधा आणि साठवण सुविधा यासारख्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्याने पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारू शकते. यामुळे शेतकऱ्यांचे काढणीनंतरचे नुकसान कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणखी चालना मिळते. हे लक्षात घेऊन संसदेत २०२५ चा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ग्रामीण भारताच्या विकासासाठी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. यामध्ये






शेतकरी, महिला, अनुसूचित जाती-जमाती उद्योजकांसाठी नवीन योजना जाहीर करण्यात आल्या असून त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक घडामोडींना चालना मिळेल.

### ग्रामविकास

केंद्रीय वित्तमंत्र्यांनी प्रधानमंत्री धन ध्यान कृषी योजना अर्थसंकल्पात जाहीर केली आहे. कमी उत्पादन, आधुनिक कृषी उपकरणांचा अभाव आणि सरासरीपेक्षा कमी कर्ज सुविधा यांसारखी आव्हाने असणाऱ्या देशातील १०० जिल्ह्यांमध्ये फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन वाढवण्यासाठी राज्य सरकारच्या सहकार्याने नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येणार आहेत. या योजनेचा फायदा १.७ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे.

किसान क्रेडिट कार्ड कर्ज मर्यादा वाढवण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून सातत्याने होत होती. कारण लागवडीच्या खर्चात लक्षणीय वाढ होऊनही अनेक वर्षांपासून या मर्यादेत सुधारणा झालेली नव्हती. पण यंदाच्या अर्थसंकल्पात याची दखल घेऊन ही मर्यादा थेट ५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी ही एक मोठी दिलासादायक तरतूद म्हणावी लागेल. कारण यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसाठी आर्थिक आधार मिळणार आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. ही वाढ केवळ त्यांचे अर्थकारण आणि जीवनशैलीच सुधारत नाही तर बँकिंग व्यवस्थेची जोखीम कमी होण्यासही यामुळे मदत होते. कारण शेतकरी कर्जाची वेळेवर परतफेड करण्यास सक्षम बनतात.

गेल्या काही वर्षांत जगभरात कर्करोगाचा विळखा वाढत आहे. भारतातही कॅन्सरग्रस्त रुग्णांची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागात दरवर्षी साधारणतः १.३ दशलक्ष रुग्ण कर्करोगाच्या विळख्यात अडकत आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर्स सुरू करण्याची घोषणाही महत्त्वाची आहे. यातील २०० केंद्रांची निर्मिती चालू वर्षी होणार आहे. ग्रामीण विकासाची संकल्पना व्यापक आहे. त्यामुळे सरकारच्या अनेक धोरणांचा अप्रत्यक्ष परिणाम यावर होत असतो. त्याअनुषंगाने अर्थसंकल्पातील जलजीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) यांसारख्या योजनांचे लाभही ग्रामीण विकासाला होतात.

यंदाच्या अर्थसंकल्पात जलजीवन मिशनची व्याप्ती २०२८ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जल जीवन मिशन ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. २०१९ मध्ये या मिशनची सुरुवात झाली तेव्हा फक्त ३.२३ कोटी (१७ टक्के) ग्रामीण कुटुंबांकडे नळाचे पाणी उपलब्ध होते. नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुमारे १९.३४ कोटी ग्रामीण कुटुंबांपैकी एकूण १५.३० कोटी म्हणजे ७९.१ टक्क्यांहून अधिक कुटुंबांना नळाचे पाणी दिले जात आहे. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीणचा दुसरा टप्पा २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात आला. या अंतर्गत गावांचे ओडीएफमधून ओडीएफ-प्लसमध्ये रूपांतर करण्यात येणार होते. याअंतर्गत, एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत १.९२ लाख गावे ओडीएफ प्लस म्हणून घोषित करण्यात आली असून आता अशा गावांची संख्या ३.६४ लाख झाली आहे.

चालू अर्थसंकल्पातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, सरकारची धोरणे ही कृषीप्रधान, ग्रामविकासाला केंद्रस्थानी ठेवणारी आहेत. परंतु गेल्या काही महिन्यांमध्ये अर्थव्यवस्थेमध्ये काहीशी सुस्ती जाणवू लागली होती. विशेषतः ग्रामीण भागातील मागणी कमी झाल्याचे दिसून आले होते. ती वाढवण्यासाठी सिंचन प्रकल्प, नदी जोड प्रकल्प, रस्ते निर्मिती, आरोग्य सुविधा यांसाठी आणखी बरेच काही करण्याची गरज आहे.

◆◆◆

## संरक्षण क्षेत्र : आव्हाने मोठी, तरतूद छोटी!

२०२४-२५ चा भारतीय संरक्षण अर्थसंकल्प तातडीच्या लष्करी सुधारणा आणि आधुनिकीकरणासाठी अपुरा पडला होता. मागील काही वर्षांपासून वृद्धिंगत होत असलेले पण तरीही अपुरे असणारे स्वदेशी संरक्षण उत्पादन, शस्त्रास्त्रांच्या आयातीतील घट आणि नोकरशाहीद्वारे होत असलेल्या अनाकलनीय विलंबामुळे,लष्कराच्या सामारिक तयारीला काहीशी खिळ पडली होती. लष्कराच्या सक्षमीकरणासाठी अचूक अपेक्षा, सुव्यवस्थित संसाधन खरेदी आणि सार्वजनिक व खाजगी लष्करी संसाधन उत्पादन भागीदारी वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. रशिया, युक्रेन आणि इस्रायल, हमास- हिजबुल्लाह युद्धांमधून उभ्या झालेल्या प्रचलित जागतिक व्यवस्थेला हादरा देणाऱ्या आधुनिक युद्ध प्रणालीच्या आव्हानांना सडेतोड उत्तर देण्यासाठी जलद लष्करी आधुनिकीकरण अत्यावश्यक आहे. भारत संरक्षण संसाधनांची आयात आणि खर्च करणारा जगातील चौथा देश आहे. असे असूनही सध्याच्या तरल, अस्थिर व स्फोटक जागतिक सुरक्षा परिस्थितीत आपली आधुनिकीकरण गती कमी आहे.

२०२४-२५ मध्ये लष्करासाठी झालेली ६.२२ लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय आवंटन, जागतिक व भारतीय संरक्षण क्षेत्रामधली तफावत कमी करू शकली नाही.लष्करीदृष्ट्या 'विकसित भारत' संकल्पनेतील पायाभूत सुविधा विकास, आधुनिकीकरण आणि स्वदेशी नवोपक्रमांसाठी अतिरिक्त/ अधिक अर्थ संकल्पीय तरतूद गरजेची होती. या पार्श्वभूमीवर यंदाच्या अर्थसंकल्पात त्यामध्ये भरीव वाढ होईल अशी अपेक्षा होती. परंतु अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या सलग आठव्या अर्थसंकल्पीय भाषणात आर्थिक वर्ष २०२५ साठी संरक्षण खर्चासाठी ६,८१,२१० लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद गेल्या वर्षी जुलैमध्ये मोदी ३.० च्या पहिल्या पूर्ण अर्थसंकल्पातील तरतुदींपेक्षा अल्पशी जास्त आहे. यामध्ये एकूण भांडवली खर्च १,९२,३८७




कोटी रुपये ठेवण्यात आला आहे, तर महसूल खर्च ४,८८,८२२ कोटी रुपये ठेवण्यात आला आहे, ज्यामध्ये पेन्शनसाठी १,६०,७९५ कोटी रुपये समाविष्ट आहेत. भांडवली खर्चाअंतर्गत, विमान आणि विमान इंजिनसाठी ४८,६१४ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत; तर नौदलाच्या ताफ्यासाठी २४,३९० कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत.

### डिफेन्स बजेट

इतर उपकरणांसाठी ६३,०९९ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत.

वास्तविक पाहता, सतत बदलत्या भू राजकीय परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रत्येक देशाला, प्रचंड मोठा दारुगोळा आणि शस्त्रसाठा उभारावा लागतो आहे. यासाठी होणाऱ्या अतिरिक्त संरक्षण संसाधन उत्पादनांमुळे ही प्रणाली खूप खर्चिक आणि महागडी झाली आहे. तसेच सर्वांचा संरक्षण संसाधनीय खर्च खूप वाढला आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. ही प्रवृत्ती २०३० पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे.

आज भारताकडे असलेले जुने रशियन टी ७२ रणगाडे, स्विस बोफोर्स तोफा आणि हवाई संरक्षण प्रणालींचे तंत्रज्ञान हे पश्चिमेकडील चीन आणि पाकिस्तानच्या द्विस्तरीय धोक्यांना (टू फ्रंट थ्रेट) तोंड देण्यास असक्षम आहे. या दोन्ही देशांची शस्त्रास्त्र तंत्रज्ञान प्रणाली आपल्यापेक्षा खूपच प्रगत आहे. त्यातच पूर्वेकडील आधीचा मित्र बांगलादेश मागील सहा महिन्यांपासून चीन व पाकिस्तानच्या सामरिक मदतीने शत्रू म्हणून उभा ठाकला आहे. त्यामुळे या पुढे भारताला,त्रिस्तरीय धोक्याला सामोर जावे लागण्याची शक्यता आहे. रशिया युक्रेन आणि इस्रायल-हमास युद्धांमुळे प्रचलित युद्ध यंत्रणा आणि रणनीतीत आमूलाग्र बदल झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, कृत्रिम संसाधन, प्रगत विद्युतीकरण आणि सांख्यिकी तंत्रज्ञान प्रणालीतील प्रगतीसाठी भरीव आर्थिक तरतूद गरजेची होती; पण याबाबत यंदाही निराशा झाली आहे. भारत तोंड देत असलेल्या वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या तुलनेत अर्थसंकल्पीय तरतूद ही नगण्य आहे. सरकारी आदेशानुसार २०२५ हे सुधारणा वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे.

यामुळे नव्या संभाव्य युद्धतयारीसाठी लष्कराचे जलद सामजिक आधुनिकीकरण व युद्ध तयारीवर भर दिला जाण्याची शक्यता आहे. पण यासाठी निधीची कमतरता हा मोठा अडसर ठरू शकतो.

जागतिक पातळीवरील संरक्षण क्षेत्रासाठी केल्या जाणाऱ्या तरतुदींची आकडेवारी पाहिल्यास अमेरिका ९१६ अब्ज डॉलर्स, चीन २९६ अब्ज डॉलर्स, रशिया १२६ अब्ज डॉलर्स आणि भारत ७२.६ अब्ज डॉलर्स असा तुलनात्मक आराखडा दिसून येतो. निधीच्या प्रचंड कमतरतेमुळे या देशांच्या तुलनेत अतिप्रगत तंत्रज्ञान, बलाढ्य नौदल आणि हवी तेवढी, हवी तशी हवाई शक्ती वाढवण्यासाठी आवश्यक असणारी भारतीय गुंतवणूक करता येत नाही. त्यामुळे, मिलिटरी पॉवर प्रोजेक्शन क्षमता मिळत नाही आणि जगाला दाखवता येत नाही. याजोडीलाच हिंद महासागर क्षेत्रावर वर्चस्व गाजवण्यासाठी आवश्यक असलेला जलद लष्करी विस्तार, मजबूत नौदल ताफा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित युद्धप्रणाली साध्य करणदेखील कठीण झाले आहे.

संरक्षण तरतुदींचा प्रभावी वापर करण्यासाठी भारतातील नवोन्मेष उद्योग (स्टार्ट अप इंडस्ट्रीज), थेट परकीय गुंतवणूक आणि संयुक्त औद्योगिक उपक्रमांना जबरदस्त प्रोत्साहन द्यावे लागेल. निधीचा प्रभावी वापर करून, चीन आणि पाकिस्तानच्या संभाव्य सामारिक धोक्यांना तोंड देण्यासाठी लष्कराने आपल्या धोरणात्मक गरजांना प्राधान्य देण्याची नितांत आवश्यकता आहे.

भारतीय लष्कर, देशाला उदयोन्मुख महासत्ता बनवू शकेल. मात्र त्यासाठी लष्कर सर्वदृष्ट्या सक्षम, बलाढ्य आणि प्रभावी असणे आवश्यक आहे आणि त्यासाठी भरीव आर्थिक तरतुदींसह सरकार तयार असणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात ही अपेक्षा पूर्ण व्हावी.

◆◆◆



## भाडेकरू आणि घरमालकाना सवलतीचा दिलासा

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या नव्या अर्थसंकल्पानुसार, आता सहा लाख रुपयांपर्यंत भाड्याने राहणाऱ्या नागरिकांचा टीडीएस कापला जाणार नाही. आतापर्यंत याची वार्षिक मर्यादा २.४ लाख रुपये इतकी होती. सरकारच्या या घोषणेमुळे भाड्याने राहणाऱ्या भाडेकरूंना मोठा दिलासा मिळणार आहे.

टीडीएस मधून सूट मिळवण्यासाठीची वार्षिक मर्यादा २.४ लाख रुपये इतकी होती. गेल्या काही वर्षांमध्ये घरभाड्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तेव्हा टीडीएसमधून सूट वाढवण्यात यावी अशी मागणी करण्यात येत होती. एखादी व्यक्ती ज्याचे वार्षिक घर भाडे २.४ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, तर त्या व्यक्तीला टीडीएस कापून घरमालकाला भाडे द्यावे लागत होते. आता वार्षिक भाड्यावर सूट मिळाल्याने ६ लाख रुपयांपर्यंत वार्षिक भाडे भरणाऱ्या भाडेकरूला टीडीएस कापण्याची गरज नाही. यामुळे भाडेकरूना मोठा फायदा होणार आहे.

### करसवलत

दुसरा मुद्दा म्हणजे या अर्थसंकल्पातून करदात्यांना स्व-मालकीच्या दोन मालमत्तेवर सूट दिली आहे.अर्थमंत्र्यांनी सर्वसाधारण अर्थसंकल्पात म्हटले आहे की, करदाते कोणत्याही अटींशिवाय दोन स्व-मालकीच्या मालमत्तांचे वार्षिक मूल्य शून्य म्हणून घोषित करू शकतात. मोदी सरकारच्या या पावलामुळे करदात्यांना मोठा फायदा होणार आहे. सध्या, करदात्याला (२ मालमत्तेचा मालक) काही अटी पूर्ण केल्या गेल्यासच कर सूट मिळू शकत होती. केवळ एकाच घरावर कर सवलत मिळत होती. दुसऱ्या घरावर बाजारमूल्यानुसार कर आकारणी करण्यात येत होती.

करदात्यांना आयकर विवरणपत्र भरताना घराच्या मालमत्तेवर कर मोजावा लागणार नाही. आता दोन घरांचे मूल्य कराच्या दृष्टिकोनातून शून्य मानलं जाणार आहे.

## अंतराळ संशोधनाला बूस्टर; पण...

### अवकाश संशोधन

अवकाश संशोधनाच्या क्षेत्रामध्ये गेल्या दशकभरामध्ये भारताने मोठी भरारी घेतली असून त्याला जागतिक प्रशंसेची पोचपावतीही लाभली आहे. अलीकडेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेकडून झालेले उड्डाणांचे शतक ही ऐतिहासिक कामगिरी ठरली. अर्थात अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातील जागतिक स्पर्धेमध्ये येणाऱ्या भविष्यकाळात दमदार कामगिरी करण्यासाठी आणखी खूप मोठी मजल भारताला मारायची आहे. त्यासाठी अवकाश संशोधनाच्या क्षेत्राला आर्थिक पाठबळ मिळणे गरजेचे आहे. मागील काही वर्षांमध्ये अंतराळ क्षेत्रासाठी दिलेल्या निधीवरुन सरकारची याबाबतची कटिबद्धता स्पष्ट होते. २०२४-२०२५ मध्ये १३,०४२.७५ कोटी रुपयांची तरतूद अंतराळ क्षेत्रासाठी करण्यात आली होती. २०२३-२०२४ मध्ये ती १२,५४३.९१ कोटी रुपये होती. आर्थिक वर्ष २०२१ मध्ये अंतराळ विभागाला स्थापना खर्चाअंतर्गत २३०.१७ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले होते. यामध्ये १९४ कोटी रुपये भारतीय अंतराळ संशोधन संघटना (इस्रो) मुख्यालयाला देण्यात आले. तसेच १२,५८७ कोटी रुपये केंद्रीय क्षेत्रातील योजना आणि प्रकल्पांसाठी देण्यात आले. यामध्ये अवकाश तंत्रज्ञानासाठी ९,७६१.५० कोटी रुपये आणि अवकाश





अनुप्रयोगांसाठी १,८१० कोटी रुपये समाविष्ट होते.

या पार्श्वभूमीवर यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये अवकाश संशोधनासाठीची तरतूद गतवेळीपेक्षा वाढवून १३,४१६.२० कोटी रुपयांवर नेण्यात आली आहे. भारताच्या अवकाश महत्त्वाकांक्षा विस्तारत असताना आणि या क्षेत्रातील व्यावसायिक हितसंबंध वाढत असताना अर्थसंकल्पात अवकाश संशोधन, उपग्रह विकास आणि खोल अंतराळ मोहिमांना चालना देण्यासाठी देण्यात आलेले आर्थिक पाठबळ महत्त्वाचे आहे. अर्थसंकल्पात विशेषतः अंतराळ संशोधनावरील भांडवली खर्चासाठी ६,१०३ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. यामुळे उपग्रह प्रक्षेपण आणि खोल अंतराळ मोहिमांसह विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. याखेरीज राष्ट्रीय भू-स्थानिक अभियान आणि राष्ट्रीय उत्पादन अभियान उच्च-तंत्रज्ञानाच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देईल आणि भारताचे जागतिक नेतृत्व मजबूत करेल.

भारताचे अंतराळ स्टार्टअप्स तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठे कार्य करत आहेत आणि अनेक कंपन्या नव्या कल्पनांना राबवत आहेत. सरकारने प्रगतीशील धोरणे आणि गुंतवणूक प्रक्रिया तयार केल्यास भारताच्या अंतराळ क्षेत्रात मोठी वाढ होऊ शकते. अनेक तज्ज्ञांना विश्वास आहे की, अंतराळ वेंचर फंड आणि उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना वाढविल्यास जागतिक सहकार्य आणि देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढू शकेल. त्यादृष्टीने विचार करता केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच अनेक मोठ्या मोहिमांना मंजुरी दिली आहे. यामध्ये चांद्रयान-४, व्हीनस ऑर्बिटर मिशन, नेक्स्ट जनरेशन लाँच व्हेईकलचा विकास आणि सतीश धवन स्पेस सेंटरमध्ये तिसऱ्या लाँच पॅडसह नवीन स्पेसपोर्टची निर्मिती यांचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक बाजारात भारताचे अंतराळ क्षेत्र अजून प्रभावी होण्यासाठी, काही महत्त्वाचे खर्च कमी करण्याची आवश्यकता आहे. सध्या आयात शुल्क आणि करांमुळे खर्च वाढतो; पण जर महत्त्वाच्या घटकांवरील शुल्क कमी केले आणि संशोधन व विकास कर सवलतीत सुधारणा केली, तर लाँचिंगचा खर्च कमी होऊ शकतो.

अंतराळ प्रक्षेपण सेवांमध्ये भारत जगभरात स्पेसएक्स, चीनच्या लाँग मार्च आणि युरोपच्या एरियन यांसारख्या कंपन्यांच्याबरोबरीने सक्षम प्रतिस्पर्धी ठरला आहे. तथापि, या क्षेत्राकडून काही मागण्याही केल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ सद्यस्थितीत इस्रोचे चाचणी केंद्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे; परंतु श्रीहरीकोटामध्ये एक पूर्ण विकसित चाचणी सुविधा असणे आवश्यक आहे. सध्या दक्षिण भारतातील अनेक कंपन्यांना चाचणीसाठी अहमदाबाद किंवा बेंगळुरूमध्ये जावे लागते. यामुळे वेळ आणि खर्च वाढतो. श्रीहरीकोटामध्ये अशी सुविधा सुरू केल्याने त्या भागातील कंपन्यांना सहजपणे चाचण्या करता येतील. याखेरीज एक अंतराळ संशोधन पार्क स्थापन करणे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्या भारतीय विद्यार्थी नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीमध्ये प्रत्यक्ष अंतराळ अनुभव घेण्यासाठी जात आहेत. हे विद्यार्थी म्हणजे भारताची संपत्ती आहेत. हे लक्षात घेता भारतात आधुनिक अंतराळ संशोधन पार्क तयार झाले तर केवळ देशाच्या क्षमता वाढणार नसून दक्षिण आशिया आणि मध्य पूर्व यांसारख्या भागांसाठी ते एक प्रमुख गंतव्य बनू शकेल.

◆◆◆






इंडो आयरिश हॉस्पिटल येथे कॅन्सर प्रबोधन यात्रेचा हिरवी झेंडा दाखवून शुभारंभ करताना प्रा.शिंदे. याप्रसंगी डॉ. दिलीप जोंधळे, डॉ. वसुधा जोंधळे, डॉ. दत्तात्रय अंधूरे, कडूभाऊ काळे, राजेंद्र पवार, विनोद परदेशी, संजय कोठारी आदी.

# जागरूकतेसाठी 'कर्करोग प्रबोधन यात्रा' प्रभावी उपक्रम

## प्रा.राम शिंदे यांचे प्रतिपादन

नगर – जनमानसांमध्ये कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती आणि त्यांना त्वरित निदानास प्रेरित करण्यासाठी 'कर्करोग प्रबोधन यात्रा' हा उपक्रम अत्यंत प्रभावी आहे. शासनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर हा उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करू, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.

शहरातील इंडो आयरिश हॉस्पिटल येथे कॅन्सर प्रबोधन यात्रेचा शुभारंभ प्रा.शिंदे यांच्या हस्ते हिरवी झेंडा दाखूवन करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. दिलीप जोंधळे, डॉ.वसुधा जोंधळे, डॉ. दत्तात्रय अंधूरे, कडूभाऊ काळे, राजेंद्र पवार, विनोद परदेशी, संजय कोठारी उपस्थित होते.

प्रा.शिंदे म्हणाले, कर्करोग हा केवळ एक आजार नसून तो एक सामाजिक आणि मानसिक आव्हान आहे. कर्करोग बळावल्यानंतर रुग्णासह संपूर्ण कुटुंबाला एका मानसिक त्रासातून जावे लागते. कर्करोगाविषयीची लक्षणे पाच वर्षापूर्वीच शरीरामध्ये दिसू लागतात. एकवेळेस कर्करोग झाला की तो बरा होऊ शकत नाही, हा गैरसमज आजही समाजामध्ये आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी प्रबोधन यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कर्करोगावर मात करत पुन्हा एकदा नव्याने आयुष्याला सुरुवात केलेली अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध आजारांवर उपचार करण्यात येत आहेत. लोकांमध्ये जनजागृती निर्माण करून आपण हा आजार वेळीच रोखू शकतो आणि समाज निरोगी ठेवू शकतो, असेही ते म्हणाले.

डॉ. जोंधळे म्हणाले, आज कर्करोगाविषयीच्या प्रबोधनाची गरज आहे. भारतामध्ये तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे कर्करोग या आजाराला बळी पडल्याच्या घटना आपण पहातो आहोत. कर्करोगावर मात करण्यासाठी वेळीच तपासणी करुन उपचार घेणे गरजेचे आहे. अहिल्यानगर येथून सुरू झालेली ही कर्करोग प्रबोधन यात्रा सातारा जिल्ह्यापर्यंत जाणार असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात हर्षल आगळे यांनी कॅन्सर प्रबोधन यात्रेबाबत माहिती दिली.

# हॉटेल व चहाच्या टपऱ्यांमधून कागद व प्लॉस्टिकचे कप पूर्णतः बंद करावेत



हॉटेल व चहाच्या टपऱ्यांमधून कागद व प्लॉस्टिकचे कप पूर्णत: बंद करावेत, या मागणीचे निवेदन आरंभ पॅलिएटिव्ह केअर सेंटरच्यावतीने देण्यात आले.

नगर – शहरात हॉटेल व चहाच्या टपऱ्यांमधून कागदाचे व प्लॉस्टिकचे कप पूर्णत: बंद करण्याची मागणी आरंभ पॅलिएटिव्ह कॅन्सर केअर सेंटरतर्फे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्लॉस्टिक व कागदाचे कप हे कर्करोगासारख्या गंभीर आजारांना कारणीभूत ठरत आहेत. कागदाच्या कपांमध्ये पॉलिथिन किंवा प्लॉस्टिकचे कोटिंग असते. जे उष्णतेमुळे वितळते आणि चहा किंवा गरम पेयांमध्ये मिसळते. यामध्ये आढळणारे बिसफेनॉल–ए आणि स्टायरीन हे रासायनिक घटक ज्ञात कॅन्सरजनक आहेत. प्लॉस्टिकचे कप देखील उष्णतेच्या प्रभावामुळे त्यामध्ये असलेल्या फॅथलेटस् व डायोक्सिन्स यासारख्या विषारी रसायनांचे उत्सर्जन करतात. जे दिर्घकाळ शरीरात राहून कर्करोग आणि अन्य आजारांना चालना देतात.

परभणी जिल्हाधिकारी यांनी ३० डिसेंबर २०२४ रोजी एक परिपत्रक काढून जिल्ह्यात कागदाचे व प्लॉस्टिकचे कप बंद करण्याचे निर्देश जारी केले आहेत. या अंमलबजावणीतून परभणी जिल्ह्यातील हॉटेल्स व टपऱ्यांमध्ये यशस्वी परिणाम दिसून आले आहेत.

कागदाचे आणि प्लॉस्टिकचे कप आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यात पूर्णत: बंद करून, पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी पर्यायांचा अवलंब करण्यासाठी हॉटेल्स व चहाच्या टपऱ्यांना मागदर्शन करण्यात यावे.

यासोबतच पर्यावरण पूरक जसे की स्टील, काचेचे किंवा मातीचे कप यांचा वापर प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष अभियान राबवावे, अशी मागणी आरंभ पॅलिएटिव्ह केअर सेंटरचे प्रदीप काकडे यांनी केली आहे.



श्री एकदंत गणेश मंडळ आयोजित नृत्य स्पर्धेस कलाकारांनी प्रतिसाद दिला. या स्पर्धेत सहभागी झालेले कलाकार.

# श्री एकदंत गणेश मंडळ आयोजित नृत्य स्पर्धेस प्रतिसाद

नगर – एकदंत कॉलनी, दातरंगे मळा येथे गणेश जयंतीनिमित्त एकदंत गणेश मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत तरुण–तरुणी, बालगटातील स्पर्धक सहभागी झाले होते. याला प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेत अनेक बालकांनी आणि तरुणांनी वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच मनोरंजन कार्यक्रमात नाटिका, सामाजिक संदेश देणारे नृत्य, तसेच एकपात्री नाटक देखील सादर करण्यात आले. या सर्व नृत्य, नाटिका सादर करणारा कलाकारांचा प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. यावेळी एकदंत ग्रुपने भागवत गीता सार हे नृत्य सादर करून सर्व प्रेक्षकांचे मने जिंकले.

सहभागी प्रत्येक स्पर्धकास रोख रुपयांच्या स्वरुपात बक्षीसे देण्यात आली. सुत्रसंचालन रोशन सुंकी यांनी केले. तर आभार ओंकार बुरगुल यांनी मानले. हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# भिंगारला लष्करी हद्दीत घरफोडी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – भिंगार परिसरात लष्करी हद्दीत असलेल्या डीएमआर येथील कॉलनीत कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सोन्याचांदीचे दागिन्यासह रोख रक्कम असा २ लाख ८१ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी श्रीमती मनीषा सुरेंद्रसिंग कैडा (वय २९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक इंगळे हे करीत आहे.

# शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या त्वरित सोडवाव्यात

## अहिल्यानगर जिल्हा शिक्षक भारती संघटनेच्या वतीने निवेदन



शिक्षकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या लवकरात लवकर सोडविण्यात याव्या, या मागणीचे निवेदन अहिल्यानगर जिल्हा शिक्षक भारती संघटनेच्या वतीने वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांना देण्यात आले.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षक शिक्षकेतरांचे अनेक वर्षांपासून विविध मागण्या प्रलंबित आहेत. शिक्षकांचे विविध समस्या समजून घेऊन आता लवकरात लवकर ही समस्या सोडविण्यात यावे, या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा शिक्षक भारती संघटनेच्या वतीने वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांना जिल्हयातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप यांनी सांगितले.

या निवेदनात वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी पात्र शिक्षकांचे वेतन श्रेणी प्रस्ताव तातडीने मंजुर व्हावेत, टप्पा अनुदानावरील शाळांना अनुदान मंजुर करावे, प्रलंबित थकीत देयके व वैदयकिय देयके त्वरीत मंजुर करावीत, डि.एड ते बी. एड व ये एम ते बी. एड प्रमोशन प्राप्त शिक्षकांना प्रमोशन मिळावे, माध्यमिक शिक्षकांवर लादण्यात आलेल्या अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्यात यावा. (उदा.–बी.एल.ओ), विनाअनुदानित शाळेतुन अनुदानित शाळेत बदलीस मान्यता द्यावी, जुनी पेन्शन योजना लागु करावी या मागणीसाठी शासनदरबारी पाठपुरावा करावा, अतिरिक्त ठरलेल्या पदांचे समायोजन करावे, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न मार्गी लावावा, प्रोव्हिडंड फंडांच्या पावत्या कर्मचाऱ्यांना मिळाव्यात, असेही सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, कार्यवाह संजय भुसारी, शेवगाव तालुका अध्यक्ष कैलास जाधव, जिल्हा समन्वयक योगेश हराळे, नगर तालुका अध्यक्ष नवनाथ घोरपडे, श्रीगोंदा प्रसिद्धी प्रमुख सचिन शेलार, सरचिटणीस नगर तालुका गोरक्षनाथ गव्हाणे, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ आशा मगर, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानित च्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी मागणी केली आहे.

# हळदी–कुंकू समारंभातून सुख–दुःख वाटून घेतले जातात

## नामदेव महिला मंडळाच्या उपाध्यक्षा निर्मला लोळगे यांचे प्रतिपादन; श्री संत नामदेव मंदिर येथे नामदेव महिला मंडळाच्यावतीने सामुदायिक हळदी–कुंकू



सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे नामदेव महिला मंडळाच्यावतीने सामुदायिक हळदी–कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आज महिलांवर घर, नोकरी, व्यवसाय सांभळण्याची मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी पाड पाडत असतांना आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे. त्याचबरोबर स्वत:कडे लक्ष देऊन आपले छंद जोपासले पाहिजे, तेव्हाच आपले मन आणि शरीर हे सुदृढ राहू शकते. हळदी–कुंकू निमित्त महिलांच्या विचारांची देवाण–घेवाण करणारा सण आहे. यातून महिलांचा विकास होण्यास मदत होत असते. आपले सुख–दु:ख यानिमित्त वाटून घेतले जातात. श्री संत नामदेव महिला मंडळाच्या माध्यमातून समाजातील महिलांच्या उन्नत्तीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत, त्यातून महिलांची प्रगती होत त्या स्वयंनिर्भार होत आहेत. सण–उत्सवानिमित्त महिलांना एकत्र करुन महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी मंडळाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, असे प्रतिपादन नामदेव महिला मंडळाच्या उपाध्यक्षा निर्मला लोळगे यांनी केले.

सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे नामदेव महिला मंडळाच्यावतीने सामुदायिक हळदी–कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे, महिला मंडळाच्या उपाध्यक्षा निर्मला लोळगे, सौ. जयश्री नेवासकर, सौ. सुवर्णा भस्मे, सौ. राजश्री धोकटे, जोति कटारे, पुजा सातपुते, सुनंदा चौकटे, मनिषा लोळगे, सुनंदा गोंदकर, हेमलाता वडे, रूपालि काकडे, वैशालि भस्मे, प्राजु लोळगे, लक्ष्मी सातपुते, कमल बोडखे, महिमा चौकटे, वर्शा काकडे, सुनिता पाटसकर, सुवर्णा बगाडे, गायत्रि लिमकर, दिपाली काकडे, पद्मा शिपिं, विद्या हैंन्द्रे, गिता बाचल, सौ.पाटसकर, स्वाति काकडे, सौ. बारटक्के, सौ.ऊरणकर, पुजा वडे, रूपालि वडे, एश्वर्या चौकटे, सौ.अस्वले, शिल्पा बाउल, अनिता चुंबळकर, सौ.व्हावळ, निर्मला बोंडगे आदी महिला उपस्थित होत्या.

प्रमिला दुमाटे म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांनी स्वत:साठी वेळ काढला पाहिजे. सण–समारंभातून एकमेकांशी संवादातून आपली प्रगती साधली पाहिजे. आपल्या संस्कृतीत महिलांना विशेष स्थान दिले आहे. अनेक सण–उत्सव हे महिलांसाठीच असतात. यातून महिलांचा विकास साधला जावा, त्यातून महिलांना व्यक्त होता यावे हा उद्देश आहे. ट्रस्टच्या माध्यमातून महिलांच्या विकासासाठी नेहमीच मदतीचा हात दिला आहे. महिलांच्या उन्नत्तीसाठी आपण एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे.

यावेळी महिलांसाठी उखाणे स्पर्धा घेण्यात आली. तसेच महिलांनी अभंग गीत गायन केले. तसेच महिलांना आरोग्य विषयक टिप्स देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री नेवासकर यांनी केले तर आभार राजश्री धोकटे यांनी मानले.

# 'आडसूळ'च्या विद्यार्थिनींना मॅथेमॅटिकल पोस्टर व मॉडेल स्पर्धेत प्रथम पारितोषिक

नगर – चास येथील साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी मॅथेमॅटिकल पोस्टर्स व मॉडेल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवले.

अहिल्यानगर येथील न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात पार पडलेल्या मॅथेमॅटिकल पोस्टर अँड मॉडेल स्पर्धेमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या २६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम वर्षातील विद्यार्थीनी शिंदे यशश्री, विधाते प्राजक्ता व झिने संस्कृती यांच्या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले. सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. घुले ए. पी., डॉ.हेमंत जाधव, डॉ.अडावकर डी.यु., डॉ.खान एस.वाय., डॉ.कांबळे व्ही.व्ही., प्रा.डौले ए.डी., प्रा. जवरे ए.आर. व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्राध्यापिका सुवर्णा झरेकर यांनी परिश्रम घेतले.

संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध माणिक आडसूळ, सचिव लीना आडसूळ, डायरेक्टर कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. पी. एम. पाटील, प्राचार्य. डॉ. संभाजी पठारे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य गडाख आर. एस. आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# हळदी–कुंकू समारंभातून महिलांच्या विचारांची देवाण–घेवाण

## अर्चना खराडे यांचे प्रतिपादन



प्रभाग क्रमांक १३ मधील महिला साठी शिवसेना शहर संघटक परेश खराडे यांच्या वतीने सामुदायिक हळदी –कुंकू कार्यक्रम घेण्यात आला.

नगर – आज महिलांवर घर, नोकरी, व्यवसाय सांभळण्याची मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी पाड पाडत असतांना आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे. त्याचबरोबर स्वत:कडे लक्ष देऊन आपले छंद जोपासले पाहिजे, तेव्हाच आपले मन आणि शरीर हे सुदृढ राहू शकते. हळदी–कुंकू निमित्त महिलांच्या विचारांची देवाण–घेवाण करणारा सण आहे. यातून महिलांचा विकास होण्यास मदत होत असते. आपले सुख–दु:ख यानिमित्त वाटून घेतले जातात. समाजातील महिलांच्या उन्नत्तीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत, त्यातून महिलांची प्रगती होत त्या स्वयंनिर्भार होत आहेत. सण–उत्सवानिमित्त महिलांना एकत्र करुन महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, असे प्रतिपादन अर्चना खराडे यांनी केले.

प्रभाग क्रमांक १३ मधील महिला साठी शिवसेना शहर संघटक परेश खराडे यांच्या वतीने सामुदायिक हळदी –कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अर्चना खराडे, अश्विनी खराडे, पूजा भगत, तारा शिंदे, अश्विनी साळवे, कमल चोरे, सुप्रिया खडामकर, उज्वला टकले, छाया कदम, मुक्ता देवतरसे, रुपाली काळे, दीपाली काळे, जोशी, फुलारी, सलोनी शिंदे, तृप्ती साळवे, सुनीता भवले, पुष्पा येळवंडे आदी उपस्थित होत्या.

अश्विनी खराडे म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांनी स्वत:साठी वेळ काढला पाहिजे. सण–समारंभातून एकमेकांशी संवादातून आपली प्रगती साधली पाहिजे. आपल्या संस्कृतीत महिलांना विशेष स्थान दिले आहे. अनेक सण–उत्सव हे महिलांसाठीच असतात. यातून महिलांचा विकास साधला जावा, महिलांच्या उन्नत्तीसाठी आपण एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे.

यावेळी महिलांना वाण म्हणून पुस्तके वाटण्यात आली. सूत्रसंचालन तारा शिंदे यांनी केले तर आभार पूजा भगत यांनी मानले

# 'मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेचे' ८ फेब्रुवारीला 'मसाप'तर्फे आयोजन

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद परिषदेच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने चाळीसगाव येथील रंगगंध कलासक्त न्यास यांच्या सहकार्याने मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेचे ८ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आल्याचे परिषदेचे अध्यक्ष किशोर मरकड यांनी सांगितले.

ही स्पर्धा गुलमोहर रोडवरील प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे सकाळी ९ वाजता सुरू होईल अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत जोशी यांनी दिली. अभिवाचन स्पर्धेसाठी विनोदी साहित्य, नर्म विनोद ते खळखळाट, प्रवास वर्णन हे विषय असून प्रत्येक संघास सादरीकरणासाठी २५ ते ३० मिनिटांचा कालावधी असेल. नेपथ्य प्रकाश योजना रंगभूषा वेशभूषा याचा स्पर्धकांना वापर करता येणार नाही. स्पर्धेसाठी प्रत्येक संघास पाचशे रुपये प्रवेश शुल्क असल्याचे परिषदेच्या खजिनदार व स्पर्धा प्रमुख डॉ. शितल म्हस्के यांनी सांगितले.

अभिवाचन स्पर्धेचे हे चौथे वर्ष असून अहिल्यानगर येथे प्राथमिक फेरी होणार आहे. चाळीसगाव येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी प्राथमिक फेरीतून संघांची निवड करण्यात येईल अशी माहिती परिषदेच्या प्रमुख कार्यवाह शिल्पा रसाळ यांनी दिली. स्पर्धेच्या दिवशी संध्याकाळी पारितोषिक वितरण समारंभ होईल.

अधिक माहितीसाठी व प्रवेश निश्चितीसाठी डॉ. शितल म्हस्के (९८२२०५४५२४) व सहकार्यवाह डॉ. श्याम शिंदे (९८६०२४५३८७) यांच्याशी संपर्क साधावा. स्पर्धेत अधिकाधिक संघानी सहभागी व्हावे असे आवाहन उपाध्यक्ष प्रा. दशरथ खोसे व प्रा. शिरीष मोडक यांनी केले आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार नगर दौऱ्यावर आले असता त्यांना प्रकाशित केलेले प्रा. डॉ. राजू रिक्कल यांचा प्रबंध ग्रंथ भेट देताना सत्येन मुथा.

# शासकीय आदर्श आश्रमशाळांमध्ये इयत्ता ५ वी च्या प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

नगर – आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शासकीय आदर्श आश्रमशाळांमध्ये अनुसूचित/आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता ५ वीमध्ये प्रवेशासाठी पूर्वपरीक्षा घेण्यात येणार असून या परीक्षेसाठी १४ फेब्रुवारी पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

शासकीय, आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा आयोजित करुन या शाळांमध्ये गुणानुक्रमे इयत्ता ५ वीमध्ये प्रवेश दिला जातो. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ५ वीच्या प्रवेशासाठी १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेमध्ये अकोले येथील अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे कन्यालय विद्यालयात ही परीक्षा घेण्यात येणार आहे. प्रवेशार्थी विद्यार्थी हा अनुसूचित / आदिम जमातीचा व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. पालकाचे उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे.पूर्वपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, विद्यार्थी व पालकाचे आधारकार्ड, विद्यार्थ्याचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आदी कागदपत्रे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर ता. अकोले या पत्त्यावर पाठवावीत, असेही कळविण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

